गुरुवार, १४ जुलै २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक ३५७
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

रानसई धरण ओव्हरफ्लो; उरणचे पाणीसंकट टळले/३
कर्जत तालुक्याला पुराचा विळखा; परिसर जलमय/५
नागोठणे परिसरातील खेळाडूंची वॉटर पोलो स्पर्धेसाठी निवड/८

## मुंबईतील वॉर्डरचनेवरून काँग्रेस नेत्याचा शिवसेनेवर आरोप



**मुंबई :** येथील महापालिका निवडणुकीचे वेध लागले असून त्याच्या तयारीला सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे. मुंबई महापालिकेची प्रभागरचना ही शिवसेनेने स्वतःच्या फायद्यासाठी केली, असा आरोप काँग्रेसचे नेते मिलिंद देवरा यांनी केला आहे. यामुळे महाविकास आघाडीतील दोन पक्षांमधील वाद पुन्हा नव्याने समोर आला आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना देवरा म्हणाले की, काँग्रेसचा विरोध असतानादेखील शिवसेनेने नवीन प्रभागरचनेचा विषय रेटून नेला. केवळ एका पक्षाच्या फायद्यासाठी मुंबईच्या वॉर्डांमध्ये फेरफार करणे हे अनैतिक तसेच घटनेच्या विरोधात आहे. देवरा यांनी या संदर्भात नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिल्याचेही या वेळी सांगितले.

# राज्यात कोसळधार

## जोरदार पर्जन्यवृष्टीमुळे पाणीच पाणी; जनजीवन विस्कळीत

**मुंबई : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून राज्यात मुसळधार पाऊस सुरू असून हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार बुधवारी (दि. १३)देखील पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. त्यामुळे अनेक ठिकाणी पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले.



राज्यात पावसाच्या जोरधारा कायम असून अनेक नदी-नाल्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी पाणी शिरले होते. कोकण, विदर्भासह पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा जोर जास्त दिसून आला. याचा फटका कर्मचारी, विद्यार्थीवर्गाला बसला.

पावसाची संततधार मुंबईत सुरूच असल्याने चेंबूरसह काही भागांत पाणी साचले. शेल कॉलनी, सावंत बाजार परिसरात रस्त्यावर पाणी आल्याने नद्यांचे स्वरुप प्राप्त झाले होते. दरम्यान, पावसाचा परिणाम रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवरही झाला. पावसामुळे लोकल विलंबाने धावत होत्या, तर रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा पहायला मिळाल्या.

### वसईत दरड कोसळून दोन जणांचा मृत्यू

**वसई :** राजवली वाघरळपाडा येथे बुधवारी (दि. १३) सकाळी अचानक डोंगराचा भाग एका घरावर कोसळून दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर दोघांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मृतांमध्ये अमित ठाकूर (३५) आणि रोशनी ठाकूर (१४) यांचा समावेश आहे, तर वंदना अमित ठाकूर (३३) आणि ओम ठाकूर (१०) यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



**रेवदंडा (ता. अलिबाग) : महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा, निरूपण व सामाजिक क्षेत्रात अलौकिक कार्य करणारे थोर निरूपणकार तीर्थरूप पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची गुरूपौर्णिमेनिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी बुधवारी निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी रायगड भूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी तसेच उरण नगर परिषदेचे माजी नगरसेवक नितीन पाटील उपस्थित होते.**

# अतिवृष्टीग्रस्त नागरिक, शेतकऱ्यांना सहकार्य करणार -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात अतिवृष्टी होऊन अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली आहे, तर शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. सध्याचे नैसर्गिक संकट लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करीत आहेत. या वेळी संकटात सापडलेल्या नागरिकांना तसेच शेतकऱ्यांना सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. ते पत्रकारांशी बोलत होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पैसे न भरल्यामुळे काही गावांचा वीजपुरवठा तोडण्यात आला आहे. या



संदर्भात आम्ही आज बैठक घेतली. २०१८ साली आपण मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना सुरू केली होती. दिवसा शेतकऱ्यांना वीज देण्याचे नियोजन होते. त्या काळात साधारण २०० मेगावॅटचे काम आपण पूर्ण केले होते, तर काही काम प्रगतिपथावर होते. नंतरच्या काळात त्याला थोडा ब्रेक लागला. ही योजना आम्ही पुन्हा एकदा फास्ट ट्रॅकवर आणली आहे. पुढच्या एका वर्षात किमान ३० टक्के ॲग्रीकल्चर फिडर सौरउर्जेवर कसे आणता येतील याबाबत आम्ही निर्णय घेतला आहे. त्याचा संपूर्ण आराखडा मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी आम्ही पाठवत आहोत.

ग्रामीण भागातील वीज बिल थकबाकी आणि पाणीपुरवठा योजनेबद्दलही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य सरकारची भूमिका मांडली. अनेक भागांत पिण्याच्या पाण्याच्या योजना तसेच पथदिवे हे बिल न भरल्यामुळे बंद आहेत. या बिलावर व्याज वाढत असल्यामुळे महावितरणची थकबाकी वाढत आहे. गावांनादेखील अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे जुनी सगळी थकबाकी एकरकमी भरणा करण्याच्या दृष्टीने महावितरण आणि राज्य सरकारने विचार करून सरकारने ही थकबाकी भरावी, सरकारने केलेल्या मदतीतून ग्रामपंचायतींनी बिले भरावीत आणि योजना सुरू कराव्यात याबाबतही एक निर्णय घेतला आहे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

२०१९ सालापासून सव्वा लाख शेतकऱ्यांनी कृषी पंपांसाठी अर्ज केलेला आहे. या सर्वांना केंद्र सरकारची कुसुम आणि राज्य सरकाच्या योजनेच्या माध्यमातून जेथे शक्य आहे तिथे सौरपंप देण्याची योजना तयार करून मुख्यमंत्र्यांकडून सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. उपसा सिंचन योजना सौरऊर्जेवर कशा चालवल्या जातील यावर विचार सुरू आहे, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील अतिवृष्टीबाधित लोकांच्या मदतीसाठी राज्य सरकार काय पावले उचलत आहे याबाबत माहिती दिली. ज्या ठिकाणी अतिवृष्टी झाली आहे त्या ठिकाणचे पंचनामे करण्याचा आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. ज्या ठिकाणी कोणी मृत्युमुखी पडला असेल तिथे एनडीआरएफच्या माध्यमातून मदत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या व्यतिरिक्त सातत्याने आढावा घेऊन त्या त्या ठिकाणी आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याबाबतही निर्देश देण्यात आले आहेत, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## निवडक

### श्रीलंकेच्या हंगामी अध्यक्षपदी रानील विक्रमसिंघेंची नियुक्ती

**कोलंबो :** श्रीलंकेत निर्माण झालेल्या अराजक परिस्थितीमुळे राष्ट्राध्यक्ष गोताबया राजपक्षे यांनी देशाबाहेर पलायन केले आहे. ते मालदिवमध्ये गेले असून तिथून दुबईला जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर रानील विक्रमसिंघे यांची श्रीलंकेचे हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी देशात राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली आहे.

### समुद्राच्या लाटेत वाहून गेलेले 'ते' तिघे सांगलीकर

**सांगली :** ओमान देशात समुद्राच्या लाटेत वाहून गेलेले तीन जण सांगली जिल्ह्यातील जत येथील असल्याचे समोर आले आहे. शशिकांत म्हमाणे, त्यांची नऊ वर्षांची मुलगी श्रुती व सहा वर्षांचा मुलगा श्रेयस हे समुद्राच्या लाटेत वाहून गेले. शशिकांत हे दुबई येथील एका कंपनीत सेल्स मॅनेजर म्हणून कार्यरत होते. सुटी असल्याने ते कुटुंबीयांसोबत ओमान या देशात फिरायला गेले होते. त्या वेळी ही दुर्घटना घडली.

# शिक्षण कधीही वाया जात नाही -डॉ. प्रदीप कामथेकर

## सीकेटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मानवी जीवनात शिक्षणाचे महत्त्व अधिक आहे. शिक्षण कधीही वाया जात नाही आणि आयुष्यात शिकण्यासारखे प्रचंड आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे वित्त आणि लेखाधिकारी सीए डॉ. प्रदीप कामथेकर यांनी बुधवारी (दि. १३) खांदा कॉलनी येथे केले. ते विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात प्रमुख मान्यवर म्हणून मार्गदर्शन करताना बोलत होते.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात (स्वायत्त) प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी व पदव्युत्तर वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा बुधवारी संस्थेचे स्फूर्तिस्थान स्व. चांगू काना



(छाया : चेतन पोपटा)

ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर डॉ. कविता चौतमोल उपस्थित होत्या. त्याचबरोबर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. **(पान २ वर..)**

### प्रत्येक विद्यार्थ्याने उत्तुंग उद्दिष्ट ठेवले पाहिजे -लोकनेते रामशेठ ठाकूर

या सोहळ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याने उत्तुंग उद्दिष्ट ठेवले पाहिजे, असे नमूद करीत त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. स्वर्गीय चांगू काना ठाकूर यांचे पुण्यस्मरण आणि त्यांच्या आदर्श विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी आयोजिलेल्या या कौतुक सोहळ्यामध्ये पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रपतिपद निवडणूक

## एनडीएच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू आज मुंबईत

**मुंबई : प्रतिनिधी**



भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) राष्ट्रपतिपदाच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू गुरुवारी (दि. १४) मुंबईत येत आहेत. भाजप नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट व अपक्ष आमदार आणि खासदारांना मुर्मू यांच्यासह होणाऱ्या बैठक व चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

द्रौपदी मुर्मू या गुरुवारी दुपारी २च्या सुमारास मुंबईत येत असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भारती पवार आणि अन्य नेते त्यांच्या समवेत असतील. भाजप, शिंदे गट व अपक्ष आमदार-खासदारांबरोबर मुर्मू यांची बैठक विमानतळाजवळील लीला हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आली आहे. आपल्या राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याचे आवाहन मुर्मू या वेळी करणार आहेत.

# आता बूस्टर डोस मिळणार मोफत

## १८ वर्षांवरील नागरिकांसाठी सरकारची मोहीम




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात कोरोना संसर्गाच्या नव्याने वाढ होत असताना सरकारने १८ ते ५९ वयोगटातील नागरिकांना कोविड लसींचे मोफत डोस देण्याचा निर्णय घेतला आहे. १५ जुलैपासून यासाठी विशेष मोहीम सुरू होणार असून या ७५ दिवसांच्या मोहिमेंतर्गत सरकारी लसीकरण केंद्रांवर कोविड लसीचा बूस्टर डोस मोफत दिला जाणार आहे.

गेल्या आठवड्यात केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने कोविड लसीच्या दुसऱ्या डोसमधील अंतर नऊ महिन्यांवरून सहा महिन्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त सरकारने कोविडच्या बूस्टर डोसला प्रोत्साहन देण्यासाठी अमृत महोत्सवाच्या रूपात मोफत लसीकरण मोहीम मर्यादित कालावधीत राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

देशात १८-५९ वयोगटातील ७७ कोटी लोकांना प्रतिबंधात्मक डोस द्यायचा आहे. त्यापैकी एक टक्क्यांहून कमी लोकांना आतापर्यंत खबरदारीचा डोस देण्यात आला आहे. तथापि, ६० वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील अंदाजे १६० दशलक्ष पात्र लोकसंख्येपैकी सुमारे २६ टक्के तसेच आरोग्यसेवा आणि फ्रंटलाईन वर्कर्सना बूस्टर डोस मिळाला आहे.

ज्या व्यक्तींनी कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस पूर्ण केले आहेत आणि त्यांना दोन्ही डोस घेऊन सहा महिने किंवा त्याहून अधिक काळ लोटला असेल त्या व्यक्ती बूस्टर डोस घेऊ शकतात. त्यासाठी ते जवळच्या खासगी लसीकरण केंद्रावर बूस्टर डोससाठी नोंदणी करू शकतात.

## राज्याच्या विविध भागांतील शाळांना आज सुटी जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून राज्यात मुसळधार पाऊस सुरू असून काही जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. अशातच राज्यातील काही भागांमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. त्यामुळे विविध जिल्ह्यांमध्ये गुरुवारी (दि. १४) शाळा बंद असणार आहेत.

हवामान खात्याकडून बुधवारी ट्वीट करीत सांगण्यात आले की, पुढील ४८ तासांत मुंबई, कोकण, पुणे, नाशिकच्या काही भागात पावसाचा जोर आणखी वाढणार आहे. त्यामुळे महत्त्वाच्या कामाव्यतिरिक्त घरातून बाहेर न पडण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत.

# बाळासाहेबांच्या आशीर्वादामुळेच मी मुख्यमंत्री -एकनाथ शिंदे

**मुंबई : प्रतिनिधी**

गुरुपौर्णिमेनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १३) शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळाला भेट देऊन अभिवादन केले. या वेळी त्यांनी बाळासाहेबांच्या आशीर्वादानेच मुख्यमंत्रिपदाची संधी मिळाली आहे, असे सांगून त्यांचे विचार आम्ही राज्यात पुढे नेतोय, असे सांगितले.

बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळावर जाऊन त्यांच्या स्मृतींना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी वंदन केले. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, बाळासाहेबांनी राज्यात मराठी माणसाला, हिंदुत्वाला ताठ मानेने जगण्याची शिकवण दिली. त्यांच्या आशीर्वादानेच आपल्याला ही संधी मिळाली





आणि या सगळ्या घडामोडी शक्य झाल्या. त्यांचे विचार मी आणि माझ्यासोबतचे आमदार पुढे नेतील.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, बाळासाहेबांच्या विचारांवर आम्ही चालत आहोत. आम्ही राज्याचा सर्वांगीण विकास करू. सर्व समाजघटकांचा उत्कर्ष, विकास हेच आमचे ध्येय असेल. म्हणूनच त्यांना वंदन करून आम्ही आशीर्वाद घेतले आहेत. बाळासाहेब आमच्या पाठीशी आहेत.

यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात आनंद दिघे यांच्या शक्तिस्थळाला भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी उल्हासनगर महापालिकेतील शिवसेनेचे नगरसेवकदेखील उपस्थित होते. उल्हासनगर पालिकेतील १५हून अधिक नगरसेवकांनी आमच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे तसेच दिंडोरी, नाशिक येथील शिवसेनेचे नगरसेवकही पाठिशी असल्याचा दावा मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी केला.

# राज्यातील आपत्कालीन परिस्थितीवर पूर्ण लक्ष

## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती; प्रत्येक जिल्ह्याच्या संपर्कात

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पावसामुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीवर पूर्ण लक्ष असून, सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क आणि समन्वय ठेवण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १३) येथे सांगितले. याबाबत राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्याशी चर्चा झाली असून त्यांना राज्यातील परिस्थितीबाबत सातत्यपूर्ण समन्वय ठेवण्याचे निर्देश दिल्याचेही मुख्यमंत्री यांनी सांगितले.

गुरू पौर्णिमेनिमित्त मुख्यमंत्री शिंदे यांनी आज दादर शिवाजी पार्क येथील स्मृतिस्थळावर वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केले. त्यानंतर ते माध्यमाच्या प्रतिनिधींशी बोलत होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सकाळपासूनच सर्व जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बोलतो आहे. त्याचबरोबर रात्री उशिरादेखील मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्याशीही चर्चा झाली आहे. धरणांतून सोडण्यात येणारे पाणी आणि त्याबाबतच्या वेळांबाबत नागरिकांना माहिती देण्याबाबत सूचना दिल्या आहेत. एकंदरीत राज्यातील सर्व यंत्रणा सतर्क आणि सज्ज आहे.



कुठलीही दुर्घटना घडू नये असे प्रयत्न आहेत. मात्र दुर्दैवाने तशी वेळ आल्यास त्या ठिकाणी तत्काळ आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणा पोहचतील असे प्रयत्न आहेत. आतापर्यंत ज्यांना स्थलांतरित केले आहे, त्यांना जेवण तसेच आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दरम्यान, हवामान खात्याने अंदाज दिल्याप्रमाणे जुलैमध्ये पावसाने कहर केला आहे. राज्यातील विविध भागात पावसाचा जोर वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील कोकणसह पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पावसाची बॅटिंग सुरु आहे. काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रात मुसळधार पाऊस कोसळणार असून काही जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, आता पुढील काही तासात महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. त्यामुळे मुंबई, कोकण, पुणे, नाशिकच्या काही भागात पावसाचा जोर आणखी वाढणार आहे. या जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या मुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या संपर्कात आहेत.

# रायगड जिल्ह्याला पावसाने झोडपले

## विविध भागांत पूरसदृश्य स्थिती, जनजीवन विस्कळीत

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगडला बुधवारी (दि. १३) पावसाने पुन्हा झोडपले. रायगडच्या मध्यभागात पावसाचा जोर होता. जिल्ह्याच्या काही भागात दिवसभर पावसाची संततधार सुरू आहे. कर्जत, खालापूर, पाली, नागोठणे, रोहा भागात दिवसभर जोरदार पाऊस सुरू आहे. यामुळे अंबा, कुंडलिका, पाताळगंगा या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. नागोठणे येथे पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. पावसामुळे जिल्ह्यातील एकूणच जनजीवन विस्कळीत झाले आहे.

सकाळपासून कोसळणाऱ्या पावसामुळे खोपोली शहरातील सखल भागात पावसाचे पाणी शिरले आहे. यामुळे छोटे-मोठे नाले ओसंडून वाहत आहेत. नद्यांच्या पाणी पातळीतदेखील वाढ होत आहे. कर्जत जवळच्या दहीवली येथील उल्हास नदीवरील पुलावरून पाणी वाहू लागल्याने तेथील वाहतूक थांबविण्यात आली आहे. शेलू भागातील ३०५ कुटुंबातील ७०३ जणांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. पाताळगंगा, कुंडलिका आणि अंबा या तीनही प्रमुख नद्या इशारा पातळीच्या वरून वहात आहेत. अंबा नदीवरील पालीजवळच्या पुलावरून पाणी वाहू लागले आहे. त्यामुळे या पूलावरून होणारी वाहतूक थांबविण्यात आली आहे. खोपोली ते वाकण दरम्यानची वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. मंगळवारी आणि बुधवारी सलग दोन दिवस हा पूल वाहतुकीसाठी बंद ठेवावा लागला आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून शाळा बंद ठेवण्याचे अधिकार संबंधित तहसीलदार यांना देण्यात आले आहेत. कर्जत, खालापूर तालुक्याबरोबरच महाडमधील शाळादेखील सोडण्यात आल्या. महाड व माणगाव तालुक्यात देखील जोरदार पाऊस होत असला तरी अद्याप कुठेही धोकादायक स्थिती निर्माण झाल्याचे वृत्त नाही. सावित्री नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने किनारपट्टीवरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्यात मध्य भागात पावसाचा जोर असला तरी किनारपट्टीच्या भागात पाऊस खूपच कमी आहे. अलिबाग, मुरूड, उरण आणि श्रीवर्धन तालुक्यात पावसाची रिपरिप सुरू असून अधूनमधून मोठी सर येत आहे. बुधवारी सकाळी संपलेल्या २४ तासात जिल्ह्यात सरासरी ७१.०१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. कर्जत तालुक्यातील माथेरान येथे सर्वाधिक २१७ मिलीमीटर पाऊस झाला तर सर्वात कमी नोंद मुरूड तालुक्यात झाली असून तेथे अवघा ५ मि.मी.पाऊस झाला आहे.

# म्हसळा तालुक्यात मुसळधार पाऊस



**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यात मुसळधार पाऊस सुरु आहे. चालू पावसाळी हंगामात आजपर्यंत १२३८ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

तालुक्यात एक जुलैपासून धुवाँधार पाऊस पडत आहे. गेल्या तेरा दिवसात ७५५ मि.मी. पावसाची नोंद झाली. बुधवारी दुपारी ११ ते १२ च्या दरम्यान सोसाट्याच्या वाऱ्याने नागरीकांनी गेल्या निसर्ग वादळाच्या आठवणींना उजाळा दिला. तालुक्यात नैसर्गिक आपत्ती नुकसानीचा आजपर्यंत १२ घटनांची नोंद झाल्याचे निवासी नायब तहसीलदार जी. एम. तेलंगे यांनी सांगितले.

तालुक्यातील पाभरे, संदेरी ही दोनही धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग होवू लागला आहे. आपत्ती काळात तालुक्यांतील झालेले नुकसान पुढीलप्रमाणे-पूर्णत: पडलेली कच्चे घर एक (आडी महाड खाडी), अंशत: पडलेली पक्की घरे चार (आंबेत दोन, पाष्टी एक, म्हसळा आदिवासीवाडी एक), स्वच्छतागृहाचे नुकसान तीन (मेंदडी, सुरई, वारळ), विहीर कोसळणे एक (फळसप), घरा भोवतालची भिंत कोसळणे दोन (आंबेत, वारळ) पशुधन हानी (मोठी जनावरे)दोन (आंबेत शॉक लागून, संदेरी पुरांत वाहून) या कालावधींत कोणत्याही झोपड्यांची, गोठ्यांची पडझड झाली नाही. जीवितहानी व जखमी व्यक्ती अहवाल निरंक, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान निरंक. दरम्यान, म्हसळा तालुक्यात आपत्ती नियंत्रण कक्ष (तहसील कार्यालय) येथे २४ तास सुरु आहे. काही आपत्ती झाल्यास कृपया पुढील क्रमांकावर ०२१४९-२३२२२४, मोबाइल ८४५९७९५३२६ येथे संपर्क साधावा असे आवाहन निवासी नायब तहसीलदार जी. एम. तेलंगे यांनी केले आहे.

# रोहा तालुक्यात पावसाचा जोर कायम



**रोहा : प्रतिनिधी**

तालुक्यात बुधवारी (दि.१३) सकाळपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे. कुंडलिका नदीने रौद्ररूप धारण केले आहे. या नदीचे पाणी पुलाला लागल्याने रोहा अष्टमी जुना पूल वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. खबरदारी म्हणून नगर परिषदेच्या वतीने दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास सायरन वाजवून नागरिकांना सावधान करण्यात आले.

रोहा तालुक्यात आठवडाभर पावसाने मुक्काम ठोकला असून बुधवारी मुसळधार पावसाने झोड उठविली. त्यामुळे तालुक्यातील नदी, नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत. कुंडलिका नदी तुडुंब भरून वाहत आहे. खबरदारी म्हणून या नदीवरील पुलाच्या दोन्ही बाजूस नगर परिषद कर्मचारी व वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले आहेत. नगर परिषदेच्या वतीने रोहा अष्टमी शहरातून रिक्षा फिरवुन नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत होते. गेले तीन चार दिवस कुंडलिका नदीकाठच्या शेतात पाणी साचून आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये स्व. चांगू काना ठाकूर यांना अभिवादन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.१३) स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रम महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पार पाडण्यात आले. महाविद्यालय प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर उपस्थित होत्या. याचबरोबर अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे, सर्व प्राध्यापक वृंद, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी दोन्ही प्राचार्यांनी चांगू काना ठाकूर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली. प्रा. महेश धायगुंडे यांनी स्व. चांगू काना ठाकूर यांच्या कारकिर्दीबद्दल व त्यांनी केलेल्या धोरणाबद्दल विशेष माहिती दिली. सुत्रसंचालन प्रा. रोहित यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# कामोठ्यातील न्यू इंग्लिश विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुरुपौर्णिमा म्हणजे व्यास पौर्णिमा ही सर्व भारत देशात साजरी केली जाते. गुरूबद्दल आपला आदरभाव व्यक्त करण्याचा हा आजचा दिवस. रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक चाळके व उपस्थित सर्व शिक्षकांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर पुष्प व भेटवस्तू देऊन सर्व शिक्षकांचे स्वागत केले गेले. विद्यालयातील नववीमधील सविता पाटील, चेतना माळी, अल्फिया चौधरी, प्रियांका मालकर, श्रेया कदम व शैलेश उंडे या विद्यार्थांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांबद्दल आदर व गुरूचे महत्त्व सांगितले.

शिक्षक प्रतिनिधी एस. एन. मोरे व श्री. फर्डे यांनी गुरूबद्दल आपले विचार मांडले. विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी आपल्या मनोगतातून गुरूमहिमा विविध उदाहरणातून सांगितला. या कार्यक्रमाचे निवेदन काजल नरसाळे हिने केले. कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयातील उपशिक्षक अनिल पाटील, डी. जी. खुटले व सहाने यांनी केले.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात गुरूपौर्णिमा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. १३) गुरूपौर्णिमा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.

प्राचार्या निशा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी गुरू आणि शिष्य यांचे नाते कसे असावे याबद्दल आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते व्यास मुनीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या गायनातून गुरूबद्दलची आपली निष्ठा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनिष्का कांबळे आणि अर्णव शिंदे यांनी केले. कार्यक्रम व्यवस्थितरित्या व्हावा म्हणून विद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. आभार स्नेहा तोडेकर हिने मानले. कार्यक्रमाकरिता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.







**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-28/22-33 **7000023978** | EHV line Maintenance S/Dn. Nagothane under 400kV R.S. (O&M) Division Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel. **... Retender thereof.** | **Rs. 40 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. Tender Fee- Rs. 500/-+ GST **Submission of bids from 13.07.2022 to 19.07.2022 up to 23:59 hrs, Opening date:-20.07.2022 @ 11:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 8356921558 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**




**पनवेल : गुरूपौर्णिमेनिमित्त नगरसेवक अजय बहिरा यांनी शहरातील श्री स्वामी समर्थ मठ मंदिरात स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन मठाधिपती सुधाकर भाऊ घरत यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी स्वामीसेवक संजय कदम, महेश सुतार, ओक काका आदी उपस्थित होते.**

# लिमये वाचनालयाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंदर्भात आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २४) सायंकाळी ५ वाजता संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष सुनिता जोशी यांनी केले आहे.

दिवंगत सभासदास श्रद्धांजली वाहणे, मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे, सन २०२१-२०२२ याकरीताचा वार्षिक अहवाल वाचून मंजूर करणे, संस्थेचे सन २०२२-२०२२ मधील हिशेब तपासनीसांनी प्रमाणित केलेले उत्पन्नखर्च व ताळेबंद पत्रक वाचून त्यास मंजुरी देणे, सन २०२२-२०२३ मधील अंदाजपत्रकास मंजुरी देणे, संस्थेकरिता तयार करणेत आलेल्या नवीन योजनेच्या प्रगतीची माहिती देणे, एप्रिल २०२२ ते मार्च २०२४ कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची निवड करणे, अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे असे सभेचे विषय असणार आहेत. सभेकरिता जास्तीत जास्त ५० सभासदांनाच हजर राहता येईल त्यामुळे प्रथम येणाऱ्या सभासदांस प्रथम प्रवेश दिला जाईल. सूचना लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयात सभेपूर्वी सात दिवस अगोदर कळवाव्यात अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

पान १ वरून

## शिक्षण कधीही वाया जात नाही -डॉ. प्रदीप कामथेकर

डॉ. प्रदीप कामथेकर यांनी पुढे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात माणसाने आयुष्यात नेहमी सक्रिय विद्यार्थी बनून सातत्याने अभ्यास करीत ज्ञानसंपादन केले पाहिजे, असे सांगून १०० टक्के प्रयत्न म्हणजेच यशाची खात्री असल्याचे अधोरेखित केले. त्याचप्रमाणे आई-वडिलांचे ऋण लक्षात ठेवले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

या सोहळ्यात सर्व पालक व गुणवंत विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी कौतुक केले व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रा. डॉ. आर. व्ही. येवले, प्रा. डॉ. जी. एस. तन्वर, प्रा. ए. व्ही. पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. एस. एन. परकाळे यांनी मानले. सोहळ्याच्या यशस्वितेसाठी विद्यार्थी परिषद तथा विद्यार्थी कल्याण कक्षाच्या अध्यक्ष डॉ. एम. ए. म्हात्रे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या प्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.





**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. १४ जुलै २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# उरणचे पाणीसंकट टळले



रानसई धरण ओसंडून वाहू लागले

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**


तालुक्याच्या पूर्व दिशेला डोंगर कुशीत वसलेल्या उरण परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई धरण क्षेत्रात गेल्या चार दिवसांपासून समाधानकारक पाऊस झाल्याने धरणाच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे काही प्रमाणात उरणवासीयांचे पुरते पाणीसंकट दूर झाले आहे. बुधवारी (दि. १३) रानसई धरण ओसंडून वाहू लागले. याशिवाय ११७.२ फूट एवढी या धरणाच्या पाण्याची वाढली असल्याचे प्रत्यक्षदर्शी दिसत आहे. त्यामुळे उरण तालुक्याच्या वर्षभराच्या पिण्याच्या पाण्याची चिंता या ५ ते ६ दिवस उरण तालुक्यात झालेल्या जोरदार पर्जन्यवृष्टीमूळे मिटली आहे, अशी माहिती एमआयडीसी उरण कार्यालयाचे उप अभियंता रवींद्र चौधरी यांनी दिली आहे.

उरण तालुक्यातील उरण शहर आणि औद्योगिक क्षेत्रांना रानसई धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मे अखेर आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात धरणाची पाण्याची पातळी अतिशय कमी होते. त्यामुळे उरणवासीयांवर पाणीकपातीचे संकट निर्माण होत असते. या वर्षी निसर्गातील बदलामुळे पावसाने उशिरा हजेरी लावली, मात्र मागील पाच दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणाच्या पाण्याची पातळी वाढली आहे. धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस पडत आहे.

रानसई धरणाची उंची १२० फूट जरी असली तरी धरणाची पाण्याची पातळी ११६.६ फूट एवढी झाली की हे धरण ओव्हर फ्लो होते. अर्ध्या अधिक उरण तालुक्याची तहान रानसई धरण भागवते. रानसई धरणातून सध्या उरण नगरपरिषद, तालुक्यातील २१ गावे आणि एनएडी, ओएनजीसी, जीटीपीएस् या प्रकल्पांना पाणीपुरवठा केला जातो.

मागील चार पाच दिवस उरण तालुक्यात मुसळधार पाऊस पडत असल्याने नद्या व नाल्यांना दुथडी भरून वाहत आहेत. त्यातच रानसई धरणाच्या पाणीपातळीत वाढ झाल्यामुळे येणाऱ्या वर्षात उरणच्या जनतेला मूबलक पाणी पुरवठा होणार असल्याने जनतेने समाधान व्यक्त केला आहे.





पनवेल : महापालिका क्षेत्रातील कामोठे नौपाडा येथील जलकुंभ जीर्ण झाल्याने तो कधीही पडून मोठी दुर्घटना होऊ शकते. त्यामुळे हा जलकुंभ महापालिकेमार्फत पाडण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी या जलकुंभाची पाहणी केली. पाहणीदरम्यान त्यांनी कामोठेमधील मलनिस्सारण वाहिन्या आणि पाण्याच्या पाइपलाइनच्या कामांचाही आढावा घेतला. या वेळी प्रभाग समिती 'क'च्या सभापती अरुणा भगत, नगरसेवक विजय चिपळेकर, दिलीप पाटील, गोपीनाथ भगत, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, एस. के. भगत आदी उपस्थित होते.



पनवेल : गुरुपौर्णिमेनिमित्त भाजप शहरच्या वतीने श्री नवनाथ मंदिराचे मठाधिपती विजय पानसरे महाराज यांचे आशीर्वाद घेऊन त्यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस अमरीश मोकल, अनुसूचित जाती मोर्चा शहर उपाध्यक्ष मधुकर उरणकर, झोपडपट्टी सेल शहर संयोजक चंद्रकांत मंजुळे, अशोक आंबेकर, गोपीनाथ लोखंडे, विलास इंगोले व कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे रायगड जिल्हा परिषदेच्या तोंडरे येथील शाळेत वह्यावाटप करण्यात आले. या वेळी तोंडरेचे माजी सरपंच राम पाटील, भाजप तालुका उपाध्यक्ष जयवंत पाटील, वसंत पाटील, चंद्रकांत पाटील, अभिमन्यू पाटील, बाळाराम पाटील, नामदेव पाटील, अरुण पाटील, लक्ष्मण पाटील, दिलीप पाटील, कुमार पाटील, रोशन पाटील आदी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये झाड कोसळले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये बुधवारी (दि. १३) सकाळपासूनच तुफान पावसाने हजेरी लावली. मुसळधार पडत असलेल्या या पावसामुळे पनवेल शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटीमधील प्लॉट नंबर येथे असलेले एक उंबराचे झाड मुळासकट कोसळले आहे. या वेळी रस्त्यावर उभ्या असलेल्या एक गाडी वर ते पडले असल्याने गाडीचे नुकसान झाले आहे, तसेच झाडाला लागून असलेली भिंती ही पडली आहे.

झाड पडल्याची घटनेची माहिती मिळताच नगरसेवक अनिल भगत यांनी तत्काळ एमएसईबी अधिकारी आणि अग्नीशमन दलाला माहिती दिली. त्यानुसार अग्नीशमन दल घटना स्थळी दाखल होत झाड बाजूला काढले. दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने लावलेल्या दमदार हजेरीमुळे नद्या व नाल्या तुडुंब भरल्या असून अनेक नद्यांनी नागरिकांना प्रशासनाच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.


## शिवाजीनगर येथे विविध धार्मिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवाजीनगर श्री. स. स. बाळकृष्ण महाराज माऊली मंदिरात गुरुपोर्णिमेनिमित्त व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर यांच्या तारखेनुसार पुण्यस्मरण दिनानिमित्त बुधवारी (दि. १३) विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना शकुंतला रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

शिवाजीनर माऊली मंदिरात सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत भजन, १० ते ११ प्रवचन, ११ ते १२ गुरुमाऊलींची पूजा-अर्चा आणि दुपारी १२ वाजता श्री गुरुमाऊलींवर पुष्पवृष्टी झाली. आरतीनंतर महाप्रसाद झाला. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन देवसाधक समाज न्हावे-न्हावेखाडी, गव्हाण-कोपर शिवाजीनगर यांनी केले असून व्यवस्थापन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कुटुंबीयांनी केले.





# गुरुपौर्णिमेनिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना गुरुस्थानी मानणाऱ्या अनेकांनी त्यांची बुधवारी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या व गुरुपौर्णिमेनिमित्त आशीर्वाद घेतले. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, नगरसेवक अमर पाटील, संतोष शेट्टी, विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, प्रवीण पाटील, नगरसेविका चारुशीला घरत, हेमलता म्हात्रे, भाजप नेते चंद्रकांत भोईर, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष योगिता भगत, उषा देशमुख, कामिनी कोळी, भाजप नेते नीळकंठ घरत, सुजाता पाटील, अंकुश ठाकूर, एमएनएम विद्यालय व टीएनजी ज्युनियर कॉलेजचे चेअरमन भार्गव ठाकूर, सुधीर ठाकूर, आशिष घरत, ओबीसी मोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष राजेश गायकर, एस. के. भगत आदी उपस्थित होते.









































पनवेल : गुरुपौर्णिमेनिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांना अनेकांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी नगरसेविका हेमलता म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, सदस्य सुजाता पाटील, उषा देशमुख, कामिनी कोळी, सुधीर ठाकूर, आशिष घरत, भाजप युवा मोर्चा पळस्पे जि. प. विभागीय अध्यक्ष आणि भिंगार ग्रामपंचायतीचे माजी सरपंच योगेश लहाने, नरेश लहाने, चेतन गायकर, किशोर गायकर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# धोक्याचे दिवस

आषाढी एकादशीच्या सुमारास महाराष्ट्रातील पर्जन्यमान कमालीचे वाढलेले असते. हे ऋतुचक्र पिढ्यान्‌पिढ्या आपल्या अंगवळणी पडले असले तरी गेल्या काही दशकांत पावसाळा आपले उग्र स्वरुप दाखवतोच असे निदर्शनास आले आहे. पर्यावरणाचा घात आणि हवामानातील बदल यांचा संबंध किती विघातक परिणाम घडवून आणू शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणून पर्यावरण तज्ज्ञ भारतातील मान्सून बदलांकडे बोट दाखवतात. याच काळामध्ये महाराष्ट्रात दरडी कोसळण्याचे प्रमाण वाढीस लागते आणि ढगफुटीसदृश पावसामुळे अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण होते.

**गेल्या आठवड्यात गुजरातमध्ये महापुराने थैमान घातले. त्यात सुमारे ६५जणांचा बळी गेला. महाराष्ट्रात तशी परिस्थिती ओढवू नये म्हणून नवनिर्वाचित शिंदे-फडणवीस सरकार कामाला लागल्याचे दिसते. अर्थात, मंत्रिमंडळ रचनेची प्रक्रिया अजून पूर्ण व्हायची आहे. सारा कारभार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दोघेच रेटताना दिसतात. गडचिरोली जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर आला असून राज्यभरात पूरस्थितीमुळे एकंदर १३० गावांचा संपर्क तुटला आहे. शिंदे आणि फडणवीस यांनी तातडीने दोन दिवसांपूर्वी गडचिरोलीचा दौरा केला. तथापि, राज्याच्या अन्य भागांमध्ये देखील अनेक ठिकाणी नद्या दुथडी भरून वाहू लागल्या आहेत आणि कुठल्याही क्षणी महापुरासारखी परिस्थिती निर्माण होईल अशी भीती व्यक्त होत आहे. रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा, कुंडलिका आणि अंबा नदीने इशारा पातळी ओलांडली आहे तर अंबा नदीवरील पुलावर पाणी आल्याने वाकण-पाली वाहतूक बंद करण्यात आली आहे. राज्यात इतरही अनेक ठिकाणी सततच्या मुसळधार पावसामुळे रस्त्यांना नदीनाल्यांचे रूप आल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. गेल्या आठवड्याभरात झालेल्या पावसामुळे राज्यात तब्बल ८९ बळी गेल्याची नोंद झाली आहे. अर्थात येत्या काही दिवसांत यात भरच पडेल अशी स्थिती आहे. येत्या ४८ तासांत मुंबईमध्ये अतिवृष्टी होण्याचा इशारा हवामान खात्याने दिला असून गरज असेल तरच घराबाहेर पडा असे महापालिकेच्या प्रशासनातर्फे वारंवार सांगितले जात आहे. आपत्कालीन यंत्रणांना अशा परिस्थितीत सतर्क राहावे लागेल आणि जीवितहानी होणार नाही याची खबरदारी घेण्यासाठी सर्वतोपरि प्रयत्न करावे लागतील. जून महिन्यात पावसाने ओढ दिल्यानंतर राज्यातील शेतकरीवर्ग काळजीत पडला होता. आता अतिवृष्टीग्रस्त ठिकाणी लवकरात लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांतर्फे आग्रही मागणी होऊ लागली आहे. या संकटातून मार्ग काढण्याचे आव्हान नव्या सरकारसमोर उभे ठाकले आहे. मुसळधार पावसामुळे नदीकाठानजीकच्या रहिवाश्यांचे अपरिमित नुकसान होते. तसेच शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जाते. पावसाचा जोर वाढता राहिल्यामुळे अनेक ठिकाणी शाळादेखील बंद करण्यात आल्या असून शिक्षणाचा खोळंबा होत आहे. मुंबई नजीकच्या पालघर आणि नवी मुंबई येथे गुरूवारीही शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे. हेही नुकसानच म्हणावे लागेल. पुढील सहा दिवस कसोटीचे जाणार आहेत असे दिसते. परंतु न डगमगता यातून मार्ग काढण्याची किमया नव्या सरकारला करून दाखवावी लागेल. सुदैवाने एक नाकर्ते सरकार जाऊन लोकभावनेचा आदर करणारे सरकार राज्यात आले आहे. त्याला केंद्र सरकारचेही पाठबळ नक्कीच मिळेल. अशा नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी केंद्राचे साह्य मिळाले तर राज्य सरकारला संकटाशी मुकाबला करणे काही प्रमाणात सोयीचे जाईल यात शंका नाही.**



# कवींद्र परमानंदांच्या समाधीस्थळाचे सुशोभीकरण आवश्यक

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर शहरातील शिवकालीन स्वामी कवींद्र परमानंद यांच्या समाधीस्थळी दरवर्षी मकरसंक्रांतीचा वार्षिकोत्सव आणि गुढीपाडव्यानिमित्त गुढी उभारण्याचा उपक्रम अखंडीतपणे सुरू आहे. मात्र, येथे गेल्या काही वर्षांपूर्वी सुशोभिकरणाचे काम रखडले. गेल्या चार पाच महिन्यांपासून या परिसराकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. समाधीस्थळी बांधण्यात आलेल्या मठामध्ये परमानंदांच्या जीवनाचा अल्पपरिचय देणारा लेखही भिंतींच्या रंगसफेदीदरम्यान दिसेनासा झाला आहे. स्थानिक कवी स्वामी परमानंद मित्र मंडळ या संस्थेबरोबरच संपूर्ण पोलादपूर शहरातदेखील याप्रकरणी नाराजी आहे. या परिसराच्या सुशोभिकरणाकडे त्वरीत लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

विधान परिषद सदस्य अशोक मोडक यांच्या निधीतून तत्कालीन भाजपा तालुकाध्यक्ष मनोज भागवत यांच्या पाठपुराव्यातून १९ एप्रिल १९९७ रोजी स्वामी कवींद्र परमानंद यांच्या समाधीस्थळी झालेल्या सुशोभिकरणाचा उद्‌घाटन सोहळा तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व.गोपीनाथ मुंडे, बांधकाममंत्री नितीन गडकरी, राज पुरोहित आणि आ. अशोक मोडक यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी याठिकाणी समाधीस्थळ आणि वाचनालयाची खोली यांचा समावेश होता. या वेळी परमानंदांच्या जीवनाचा अल्पपरिचय देणारा लेख भिंतीवर होता. यानंतर ग्रामपंचायतीकडून रायगड जिल्हा परिषदेमार्फत स्वामी परमानंद मित्र मंडळ या नोंदणीकृत संस्थेला दिवाबत्तीसाठी काही रक्कमेची तरतूद केली होती. याशिवाय, पोलादपूर ग्रामपंचायतीने काही रक्कम खर्ची घालून संरक्षण भिंत तसेच रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्यकार्यकारी अधिकारी विश्वास पाटील यांनी सुशोभिकरणासाठी निधीची उपलब्धता केली. हे काम अपूर्ण असतानाच एका स्थानिक संस्थेमार्फत येथे दूर्गसृष्टी उभारण्याचे काम सुरू झाले. यानंतरही येथे निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही देण्यात आली होती. मात्र त्याची पूर्तता झाली नाही. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी या समाधीस्थळाला भेट दिली आहे.

पोलादपूर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या कवींद्र परमानंद मठ परिसरात हिंदू मुस्लिम ऐक्याची प्रचिती संक्रांत आणि गुढीपाडवा मेळाव्यासह अनेक सार्वजनिक उत्सवप्रसंगी दिसून आली आहे. पोलादपूर ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाल्यानंतर याठिकाणचे स्थानिक नगरसेवक संगीता इंगवले त्यानंतर सध्याचे स्थानिक नगरसेवक प्रसाद इंगवले व त्यांच्या आईंनी स्वामी कवींद्र परमानंद मठामधील उत्सव सुरू ठेवले. अलिकडेच, या समाधीस्थळाचे सुशोभिकरण करण्यासाठी नगरपंचायतीने खर्च केला असून महाबळेश्वर रस्त्यालगतच्या बाजारपेठ रस्त्याच्या प्रारंभी दहा पावलांवर या मठाच्या प्रवेशद्वाराची कमान उभारण्यात आली आहे.

ऐतिहासिक वास्तूला सध्या अत्याधुनिक कार्यालयासारखे स्वरूप आणून झालेले सुशोभीकरण जरी दृष्टीकोनातून खटकत असले तरी काही प्रमाणात सुशोभीकरण झाले असल्याचे समाधान वाटत आहे. यादरम्यान, स्थानिक कवी स्वामी परमानंद मित्र मंडळ या संस्थेकडून दरवर्षी मकरसंक्रांतीचा वार्षिकोत्सव आणि आनंदनगरकडून चैत्र प्रतिपदेला गुढी उभारण्याचा उपक्रम नियमित होत आहे. २०१३ च्या गुढीपाडव्यावेळी नववर्षशोभा यात्रेचे आयोजन करून यात्रेचे विसर्जन याठिकाणी गुढी उभारून करण्यात आले होते. यावेळी सदर पदाधिकारी व त्यांचे कुटुंबीय या सोहळ्यात सामील झाले होते. ग्रामस्थांच्या काही शंकांना उत्तरे देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मिटींगमध्ये देणगीदारांच्या नावाचा फलक व देणगीची रक्कम तसेच कोणत्या निधीतून सुशोभीकरण व दूर्गसृष्टी साकार झाली. या विषयांचीही चर्चा झाली. त्याविषयांवर नंतर पुढील कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे या मिटींगला उपस्थित राहिलेल्या ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारातील एक राजकवी

***कवी परमानंद स्वामींचे येथील समाधीस्थळ उपेक्षित असल्याने इतिहासप्रेमींतून नाराजी व्यक्त होत आहे. परमानंद हे शिवाजी महाराजांच्या दरबारी राजकवी होते. राजांनी त्यांना मठ गल्लीतील जागा भेट दिली होती. या परिसरात त्यांचा वाडा, एक बारव (विहीर) होती. समाधी मंदिरात समाधी शिळा असून, त्यावर शैव आणि इतर काही पुरावे आढळतात. येथे परमानंद हे अध्ययन आणि अध्यापनाचे कार्य करीत. १७व्या शतकातील शिवभारत तथा अनुवंश पुराण या काव्यरूपी ग्रंथाची निर्मिती त्यांनी केली. हा ग्रंथ माहितीचा खजिना ठरला आहे. यात आग्र्याहून सुटका, उंबर खिंडीची लढाई शिवाजीराजांनी स्वतः लढली त्याचे वर्णन, तसेच अफझलखानाचा वध इत्यादीची माहिती आहे. शिवचरित्रामध्ये परमानंद कवींना मोठे महत्त्व आहे.***



## बदलते तंत्रज्ञान



### ऋतूनुसार बदलता येणार आता फोनचा डिस्प्ले

ॲपल लवकरच एक असे तंत्रज्ञान विकसित करणार आहे की, ज्यामुळे तुम्ही भर पावसातही आयफोन वापरू शकणार आहात. कंपनीने याचे पेटंटदेखील सेक्युर केले आहे. सध्याचे आयफोन वॉटर रेजिस्टंट असले तरी पावसात ते वापरणे अजूनही खूप कठीण आहे. पावसात फोनच्या डिस्प्लेवर पाणी पडल्यामुळे टचस्क्रीन व्यवस्थित काम करत नाही. अशावेळी फोनचा वापर करणे खूप कठीण होऊन बसते.

ॲपल कंपनीने नेमके याच समस्येवर तोडगा काढण्याची तयारी सुरू केली आहे. कंपनी नव्या फोनमध्ये 'वेट मोड' सारखे एक जबरदस्त फिचर दिले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवे आयफोन आता ऋतूनुसार टच सेन्सिटिव्ह ॲडजेस्टेबल असणार आहेत. युएसपीटीओ नंबर ब्रँडने लेटेस्ट पेटंटसाठी मंजुरीदेखील दिली आहे. आयफोन असे काम करणार आहे. त्यानुसार पेटंटनुसार ॲपल कंपनी आपले स्मार्टफोन पावसातदेखील काम करु शकतील अशा पातळीवर अपडेट करण्याची तयारी करत आहे. यासाठी कंपनी स्मार्टफोनमध्ये इनबिल्ट प्रेशर आणि मॉस्चर सेंसर देऊ शकते. हे सेंसर पाण्याचे अस्तित्व ओळखून त्यानुसार स्क्रीनची क्षमता ॲडजस्ट करू शकतील. सॉफ्टवेअर ऑन-स्क्रीन बटन्समध्ये काही बदल केले जातील. जेणेकरुन पावसात ॲक्सीडेंटल टचची भीती राहणार नाही.

कंपनीनं पेटंट फायलिंगमध्ये नमूद केलेल्या माहितीनुसार इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसमध्ये मॉस्चर डिटेक्टर देण्यात येणार आहे. जे स्मार्टफोनच्या प्रोटेक्टिव्ह कव्हरवर अस्तित्वात असलेल्या मॉस्चरला डिटेक्ट करतील. एका ठराविक क्षमतेपेक्षा अधिक फोन ओला झाल्यास प्रोसेसर टच इव्हेंटची पोझिशन बदलली जाईल. पेटंट डॉक्यूमेंटमधील माहितीनुसार टच रिस्पॉन्स फिचरला कॉन्फिगर करण्यासाठी वेगवेगळे मोड्सदेखील देण्यात येऊ शकतात. यात वेट, ड्राय आणि अंडर-वॉटर मोड दिले जाऊ शकते. वेट आणि ड्राय मोडमध्ये आयफोन फोर्स इनपूटमध्ये बदल होऊ शकतो.

# थोर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर

गोपाळ गणेश आगरकर यांचा १४ जुलै रोजी १८५६ रोजी सातारा जिल्ह्यातील टेंभू येथे झाला. ते महाराष्ट्रातील विचारवंत, समाजसुधारक, पत्रकार व शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्या कार्याचा घेतलेला हा आढावा-

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक जागृतीत आगरकरांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी समाज प्रबोधन करण्यासाठी सुधारक, केसरी व मराठा या वृत्तपत्रांचा आधार घेतला. सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता आणि विज्ञाननिष्ठा ही त्यांची जीवनमूल्ये होती. मुलींनासुद्धा शिक्षण मिळायला पाहिजे असा लेख त्यांनी सुधारक या वृत्तपत्रात लिहिला. बुद्धिप्रमाण्य वादाचे पुरस्कार करून महाराष्ट्रामध्ये समाज सुधारणा घडून आणणे या उद्देशाने समाजसुधारणा करणाऱ्या समाजसुधारकांमध्ये गोपाळ गणेश आगरकर यांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या मांदियाळीतील क्रांतिकारी समाजसुधारक म्हणून आगरकर आहेत. आगरकर यांच्या घरच्या गरिबीमुळे शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी त्यांना अनेक मार्ग चोखाळावे लागले. कधी मामलेदार कचेरीत उमेदवारी करून, कधी कंपाउंडरचे काम करून त्यांनी आपले मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणासाठी ते कऱ्हाड, अकोला, रत्नागिरी येथे गेले. १८७५ साली ते मॅट्रिक झाले व महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी पुण्याला आले. पुण्यात त्यांनी डेक्कन कॉलेजला प्रवेश घेतला. वर्तमानपत्रात लिखाण करणे, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा यात भाग घेऊन बक्षिसे जिंकणे, शिष्यवृत्ती मिळविणे अशा प्रकारे त्यांची गुजराण चालत असे.



गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य टिळक यांची ओळख १८७९मध्ये एम. ए. करताना झाली. त्यांनी एकत्रच शिक्षण घेतले होते. त्यांनीच त्यावेळेस केसरी वृत्तपत्र सुरू करायचे ठरवले होते. त्यात लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर व विष्णूशास्त्री चिपळूणकर या तिघांचा पुढाकार होता. आगरकर हे बाळ गंगाधर टिळकांनी सुरू केलेल्या केसरी वृत्तपत्राचे पहिले संपादक होते. १५ ऑक्टोंबर १८८७ला केसरी वृत्तपत्राचे संपादकत्व त्यांनी सोडले.

## निमित्त

पुण्यात महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना लोकमान्य टिळक व आगरकर या दोघांच्याही मनात स्वदेशसेवेची प्रेरणा जागी झाली. दिनांक १ जानेवारी १८८० रोजी विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. आगरकर १८८१ मध्ये एम. ए. झाल्यावर चिपळूणकर यांना जाऊन मिळाले. आगरकर व टिळक यांनी १८८१ मध्ये इंग्रजीतून 'मराठा', तर मराठीतून 'केसरी' अशी दोन वृत्तपत्रे चालू केली. केसरीचे संपादकत्व आगरकरांनी स्वीकारले.

पुढे लोकमान्य टिळक व आगरकर यांनी २४ ऑक्टोबर १८८४ला डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व त्या अंतर्गत १८८५ साली फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. आगरकर याच कॉलेजमध्ये शिकवू लागले, पुढे ते फर्ग्युसनचे प्राचार्यही झाले. १८८४ साली बाळ गंगाधर टिळक, विष्णूशास्त्री चिपळूणकर आणि आगरकरांनी पुण्यात डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. १८८८ साली त्यांनी 'सुधारक' हे वृत्तपत्र सुरू केले. गोपाळ गणेश आगरकर हे आधुनिक तत्त्वांना प्रमाण मानून समाज सुधारणांचा पाठपुरावा करणारे समाजप्रबोधक होते. महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला विवेकाचे, बुद्धिप्रमाण्याचे व व्यक्तिस्वातंत्र्याचे अधिष्ठान देऊन, परिवर्तनाचे विज्ञाननिष्ठ तत्त्वज्ञान निर्माण करण्याचे श्रेय गोपाळराव आगरकरांकडे जाते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला गती या काळामध्ये प्राप्त करून देण्याचे काम गोपाळ गणेश आगरकर यांनी केले. आगरकरांनी बुद्धिवादाचा आधार घेऊन सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. बुद्धीला पटेल तेच स्वीकारले पाहिजे. केवळ अंधानुकरण करून ग्रंथांमध्ये दिले आहे म्हणून ते स्वीकारणे अयोग्य ठरते. रुढी प्रमाण्याऐवजी वैज्ञानिक कार्यकारणभावांनी युक्त बुद्धिप्रमाण्यवाद रुजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्त्री सुधारणेचा पुरस्कार करताना स्त्रियांनादेखील पुरुषांच्या बरोबरीने हक्क व अधिकार असले पाहिजेत हा विचार् प्रभावीपणे त्यांनी मांडला. बालविवाह, अस्पृश्यता यांसारख्या समाजातील अनिष्ट रूढी आधी नष्ट केल्या पाहिजेत अशा विचारांचे ते होते.




**माणगाव : माणगाव बस स्थानकातील खड्ड्यांचे मोठे साम्राज्य हे प्रवाशांची डोकेदुखी ठरत आहे.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात एनर्जी वाढवा!

पाऊस उशीरा सुरू झाला असला तरी गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली संततधार थांबायचे नाव घेत नाही. ओलसर आणि दमट वातावरणामुळे डास, माश्या यांचे वाढते प्रमाण आणि त्याचा आरोग्यावर होणारा परीणाम हे यामुळे होतेच. आरोग्यासाठी फारशा चांगल्या नसलेल्या या काळात सर्दी, ताप, खोकला, पोटदुखी, जुलाब, गॅसेस अशा काही ना काही समस्या उद्‌भवतात. सध्या तर घरोघरी लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत कोणाची ना कोणाची तब्येत बिघडली असल्याचे चित्र असते. अशावेळी आजारी पडल्यावर डॉक्टरकडे जाऊन गोळ्या-औषधे घेण्यापेक्षा आजारी पडूच नये आणि प्रतिकारशक्ती वाढावी यासाठी काळजी घेतली पाहिजे. पावसाळ्यात तब्येत चांगली ठेवण्यासाठी आयुर्वेदिक घरगुती काढा घेतला तर त्याचा निश्चितच चांगला उपयोग होतो. तसेच पावसाळ्यात आपल्याला गळून गेल्यासारखे होते. अशावेळी काढा किंवा एनर्जी ड्रिंक घेणे फायदेशीर ठरते. इन्स्टाग्रामवर आयुर्वेदिक हिलिंग या पेजच्या माध्यमातून या ड्रींकची रेसिपी शेअर करण्यात आली आहे. आयुर्वेदिक डॉ. ऐश्वर्या संतोष यांनी या रेसिपी शेअर केल्या आहेत. सोप्या पद्धतीने घरच्या घरी करता येणारे हे ड्रींक आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त ठरु शकतात. पाहूयात हे ड्रींक कसे तयार करायचे.



सुंठ आणि धण्याचा काढा-सुंठेपासून तयार केलेला चहा आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असतो. सर्दी, कफ कमी करण्यासाठी पचनाच्या तक्रारी दूर करण्यासाठी आणि प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी सुंठेचा उपयोग होतो. एक चमचा सुंठ पावडर, एक चमचा धणे, काळी मिरी एक चमचा, जीरे पावडर दोन चमचे, आवडीनुसार गूळ आणि तीन कप पाणी १५ मिनिटे उकळवायचे. त्यानंतर गाळून गरमागरमच प्यायचे.

तुळस आणि लिंबाचा चहा-तुळस आणि लिंबू या दोन्हीमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात. कफ पातळ होण्यासाठीही तुळस आणि लिंबू उपयुक्त ठरते. तीन कप पाणी, चार चमचे लिंबाचा रस आणि २५ ते ३० तुळशीची पाने घ्यावीत. तुळशीची पाने स्वच्छ धुवून १० मिनिटे पाण्यात उकळावीत आणि त्यात लिंबाचा रस घालून हे मिश्रण प्यावे. अनेकदा सर्दी किंवा कफ झाला की आपला घसा खराब होतो. घसा खवखवणे, आवाज बसणे, कोरडा खोकला येणे या समस्यांवर ज्येष्ठमध अतिशय फायदेशीर ठरतो. ज्येष्ठमधाची पावडरही बाजारात सहज मिळते. ही पावडर तीन चमचे आणि खडीसाखर १.५ चमचा तीन कप पाण्यात चांगले उकळावे आणि प्यावे. खडीसाखर पाण्यात घालून ती पाण्यात विरघळेपर्यंत उकळावी, त्यानंतर ज्येष्ठमधाची पावडर घालून हे मिश्रण १० मिनिटे उकळावे आणि गाळून प्यावे.

# कर्जत तालुक्याला पुराचा विळखा

## ■ उल्हास नदीवरील दहिवली, मालेगाव, पाषाणे पूल पाण्याखाली






(छाया : संतोष पेरणे)



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : बातमीदार**

मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उल्हास नदीला पूर आला आहे. बुधवार (दि. १३) सकाळपासून नदी धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहे. नदीवरील दहिवली मालेगाव येथील पूल पाण्याखाली गेला आहे. तर पाषाणे पुलाला पाणी लागले आहे. दरम्यान, नदी काठच्या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे.

कर्जत तालुक्यात आषाढी एकादशीच्या आदल्या दिवशी लागलेला पाऊस थांबण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे. तालुक्यांत सरासरी ४१ टक्के पाऊस झाला असून माथेरानमध्ये पाण्याची सरासरी दुप्पट आहे. हवामान खात्याने जाहीर केल्याप्रमाणे कर्जत तालुक्यात रात्रभर पावसाची संततधार सुरू आहे. लोणावळा, खंडाळा घाटात पडणारे पावसाचे पाणी उल्हास नदीच्या माध्यमातून कर्जत तालुक्यात येत असते आणि त्यानंतर कर्जत तालुका जलमय होत असतो.तालुक्याच्या मध्यवर्ती भागातून वाहणारी उल्हास नदी बुधवारी सकाळपासून धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहे. या नदीवरील कर्जत शहरातील आमराई येथील पायपुलाला पाणी टेकले असून ४४मीटर उंचीच्या बंधाऱ्यावरून बुधवारी दुपारी पाणी वाहू लागले आहे. त्याचा फटका कर्जत शहरातील बामचा मळा आणि नाना मास्तर नगरला बसला. नाना मास्तर नगरमधील मुख्य रस्ता जलमय झाला असून त्या भागात ओढ्याचे पाणी शिरले आहे. शहरातील इंदिरानगर भागातदेखील पाण्याचा वाढता प्रवाह धोका ठरू शकतो. तर उल्हास नदीकाठच्या बामचा मळा येथील घरांच्या पायऱ्यांना पुराच्या पाण्याचा वेढा पडला आहे.

**■ नेरळ आणि भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात पाणी**

*मध्य रेल्वे मार्गावरील नेरळ स्थानकात पावसाचे पाणी शिरले आहे. नेरळ-माथेरान मिनीट्रेनच्या स्थानकात तसेच फलाटावरदेखील पाणी पोहचले असून प्रशासनाकडून तो रस्ता बंद ठेवण्यात आला आहे. तर भिवपुरी रोड स्थानकात कर्जत बाजूकडील पाणी वाहून नेणाऱ्या दोन मार्गिका पाण्याखाली गेल्या आहेत. त्यामुळे स्थानिक प्रवाशांना पाण्यातून वाट काढत रेल्वे स्थानकात जावे लागत आहे.*

उल्हास नदीला आलेल्या महापुराच्या पाण्याचा सर्वाधिक धोका माथेरान-नेरळ-कळंब या रस्त्याला बसला असून या रस्त्यावरील दहिवली-मालेगाव येथील पूल सकाळीच पाण्याखाली गेला आहे. तर दुपारी या पुलावरून तब्बल चार फूट पाणी वाहून जात होते. तेथील पाण्याचा वेग लक्षात घेऊन मालेगावचे पोलीस पाटील प्रकाश पाटील यांनी पुलावरून कोणतेही वाहन जाऊ दिले नाही. याच रस्त्यावर धामोते येथील सखल भागातील रस्ता चार फूट पाण्याखाली गेला असून ही स्थिती रात्रीपासून कायम आहे. उल्हास नदीवरील रायगड जिल्हा हद्दीमधील शेवटचे गाव असलेल्या पाषाणे येथील पुलाला पाणी लागले आहे.

उल्हास नदीला आलेल्या महापुराचा फटका नदी काठच्या काही गावांना बसण्याचा धोका निर्माण झाला आहे. उल्हास नदीच्या तीरावर कर्जत तालुक्यातील मालवाडी, बेंडसे, वावे, बार्डी, कोल्हारे, धामोते, हंबरपाडा, बिरदोले, शेलू या गावांना मोठा फटका बसत असतो. त्यामुळे त्या त्या ठिकाणी काय स्थिती आहे याची माहिती पोलीस आणि तालुका प्रशासन घेत आहे.प्रांत अधिकारी अजित नैराळे आणि तहसीलदार विक्रम देशमुख यांच्याकडून पाहणी केली जात आहे.



## शाळा बंद, पुराच्या भीतीने आवराआवर

**कर्जत : प्रतिनिधी**

पावसाने कर्जत तालुक्यात थैमान घातले आहे. त्यातच पौर्णिमा असल्याने रात्रभर मुसळधार पाऊस कोसळत होता. कर्जत शहर उल्हास नदीच्या काठावर असल्याने कधीही नदी उलटून पाणी शहरात येऊ शकते म्हणून शाळा व्यवस्थापनाने सोशल मीडियाद्वारे पालकांना शाळा बंद असल्याचे कळवले. त्यामुळे लहान मुले शाळेत आली नाहीत.

गेल्या वर्षी पौर्णिमेच्या आदल्या दिवशीच कर्जत शहरात पाणीच पाणी होऊन नागरिकांचे खूप नुकसान झाले होते. त्या अनुभवावरून तळमजल्यावर राहणाऱ्या अनेक नागरिकांनी घरातील सामानाची आवराआवर सुरू केली आहे. त्यातच लोणावळा जलाशयाची पातळी वाढत असल्याने उधील २४ तासात सांडव्यातून अनियंत्रित स्वरूपाचा विसर्ग होण्याची शक्यता आहे. असे मेसेज सोशल मीडियावर येऊ लागल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

पुराच्या भीतीने कर्जतमधील कोतवाल नगर, विठ्ठल नगर, महसूल वसाहत आदी भागातील नागरिकांनी आपली वाहने मंगळवारी रात्री व बुधवारी सकाळी सुरक्षित ठिकाणी उंच रस्त्यावर हलविली आहेत. काही जण नदी काठावर पाण्याचा अंदाज घेण्यासाठी फेऱ्या मारीत आहेत.

बुधवारी सकाळीच मालवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाणी उलटल्याने पलीकडे राहणाऱ्या आदिवासींनी आपल्या कुटुंब कबिल्यासह स्थलांतर केले. नगर परिषद व तहसीलदार विभागही सज्ज झाला आहे.

# जिल्ह्यात ११ दिवसांत दोन लाख ८७ हजार रोपांची लागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**



जिल्हा परिषदेच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये १ ते ३१ जुलै कालावधीत मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, सहा लाख ४४ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यानुसार १ जुलै ते ११ जुलै या ११ दिवसात जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध प्रजातींच्या दोन लाख ८७ हजार ६७ वृक्षांची लागवड करण्यात आली असल्याची माहिती रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरकुटे यांनी दिली.

वृक्ष लागवड मोहीम प्रामुख्याने ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालये, आरोग्य केंद्र व उपकेंद्र, पशुवैद्यकीय दवाखाने, तिर्थक्षेत्र, पर्यटन स्थळे, समुद्र किनाऱ्यावरील खुल्या जागेत, दरड प्रवण क्षेत्रातील डोंगर पायथ्याच्या महत्त्वाच्या ठिकाणी, पुरक्षेत्रातील गावामधील नदी किनाऱ्यालगतच्या ठिकाणी राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा शुभारंभ १जुलै रोजी अलिबागमध्ये कुंठेबाग व वरसोली समुद्र किनारी वृक्ष लागवड करून करण्यात आला होता. या मोहिमेंतर्गत जिल्हाभरात भारतीय प्रजातींची विविध झाडे लावण्यात येत असून, बांबूची बेटे निर्माण करण्याचे विशेष नियोजन करण्यात आले आहे.

वृक्ष लागवड कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुकास्तर, ग्रामपंचायत स्तरावर स्वयंसेवी संस्था, स्वदेश फाऊंडेशन, रोटरी क्लब, लायन्स क्लब, स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, स्वयंसेवक, स्वयंसहाय्यता बचत गटातील महिला, गावातील महिला मंडळे, भजनी मंडळे व युवक यांचा लोकसहभाग घेण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात महिनाभरात सहा लाख ४४ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट तालुकास्तरावर देण्यात आले होते. त्यामधील ११ जुलैपर्यंत दोन लाख ८७ हजार ६७ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. ज्या ग्रामपंचायतींनी त्यांना दिलेले उद्दिष्ट पूर्ण केलेले नाही, त्यांनी वेळेत दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, अशा सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

| तालुका | रोप लागवड उद्दिष्ट | झालेली रोप लागवड |
|---|---|---|
| अलिबाग | ४९ हजार ६०० | ५८ हजार ६०० |
| खालापूर | ३५ हजार २०० | २४ हजार १८० |
| कर्जत | ४३ हजार २०० | २३ हजार ७९ |
| महाड | १ लाख ७ हजार २०० | ४ हजार ८०० |
| माणगाव | ५७ हजार ६०० | ३२ हजार १८६ |
| म्हसळा | ३१ हजार २०० | १ हजार ४०२ |
| पनवेल | ५५ हजार २०० | २४ हजार ५६० |
| श्रीवर्धन | ३४ हजार ४०० | २२ हजार ९०० |
| पोलादपूर | ३३ हजार ६०० | ४ हजार ८०७ |
| मुरुड | १९ हजार २०० | १५ हजार ७५० |
| पेण | ५२ हजार | १४ हजार ९२० |
| रोहा | ५१ हजार २०० | ११ हजार ४९८ |
| तळा | २० हजार | १० हजार १४५ |
| सुधागड | २६ हजार ४०० | २६ हजार ४०० |
| उरण | २३ हजार | ११ हजार ८४० |
| एकूण | ६ लाख ४४ हजार | २ लाख ८७ हजार ६७ |

# माणगावच्या काळ नदीपुलावर खड्डेच खड्डे

**माणगाव : प्रतिनिधी**

सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे काळ नदीवरील माणगाव येथील पूलावर जागोजागी खड्डे पडले असून, त्यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे.

माणगावमधील काळ नदीचा पूल मुंबई-गोवा महामार्गावर असून, दिवसांतून हजारो वाहने या पुलावरून ये-जा करीत असतात. पुलावर पडलेल्या खड्ड्यांत पावसाचे पाणी साचत असल्याने वाहन चालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे या खड्ड्यांत वाहने जोरात आदळतात. सध्या मुसळधार पाऊस पडत असल्याने रात्रीच्या वेळी या खड्ड्यांत वाहने जोरात आपटत आहेत. मंगळवारी (दि. १२) रात्री माणगावमधील काळनदी पुलावर पडलेल्या एका मोठ्या खड्ड्यात दुचाकी आदळल्याने दुचाकीस्वाराच्या पाठीमागे बसलेली महिला खाली पडली. सुदैवाने ही दुचाकी हळू जात असल्याने या महिलेला किरकोळ दुखापत झाली. या खड्ड्यांकडे सार्वजनिक बांधकाम खात्याने लक्ष देऊन हे खड्डे चांगल्या प्रकारे तातडीने बुजवावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



(छाया : सलीम शेख)

## माणगावजवळ कोकण रेल्वेच्या धडकेने एक जणाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील खरवली गावच्या हद्दीत ओपन अम्ब्रेला हॉटेलच्या मागे कोकण रेल्वेच्या धडकेने एका ४७ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवार (दि. १२) रात्री घडली.

माणगावजवळच्या खरवली गावच्या हद्दीत भिवा (भीमसेन) गोविंद जाधव (वय ४७, रा. कळमजे आदिवासीवाडी, ता. माणगाव) यांना मंगळवारी रात्री गोवा बाजूकडून मुंबईकडे जाणाऱ्या कोणत्यातरी कोकण रेल्वेची धडक लागली. या अपघातात भिवा जाधव यांना गंभीर स्वरूपाच्या दुखापती होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला.

रेल्वे सुरक्षा बलाचे पोलीस शिपाई प्रवीण दिनेश सोनुने यांनी या घटनेची खबर माणगाव पोलीस ठाण्यात दिली असून, अधिक तपास हवालदार रावसाहेब कोळेकर करीत आहेत.

## माणगावमधील कशेणे गावात घरफोडी

**■ लाखो रुपयांचा ऐवज घेऊन अज्ञात चोरटा फरारी**

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील कशेणे गावातील घराच्या बंद खिडकीची जाळी तोडून अज्ञात चोरट्याने मंगळवारी (दि.१२) रात्री घरातील सोन्याचे दागिने, मोबाइल व रोख रक्कम असा एकूण एक लाख ३३ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

माणगाव तालुक्यातील कशेणे येथील विमल सुरेश कोंडे (वय ५६) यांच्या घराच्या बंद खिडकीची जाळी तोडून तेथून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला व घरातील कपाटात ठेवलेले सुमारे एक लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, एक मोबाइल आणि रोख रक्कम असा एकूण एक लाख ३३ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी विमल कोंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहाय्यक निरीक्षक श्री. मोहिते करीत आहेत.

# कर्जतमधील विद्यार्थ्यांची आनंददायी दिंडी




**कर्जत : बातमीदार**

आषाढी एकादशी निमित्त कर्जतमधील शारदा मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी आनंददायी दिंडी काढली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी दहिवली येथील मंदिरात जावून विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले.

कर्जत शहरातील शारदा मंदिर शाळेच्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त आनंददायी दिंडी काढली होती. टाळ, मृदुंग, ज्ञानोबा-तुकाराम असा गजर करत हे छोटे वारकरी दिंडी घेऊन दहिवली येथील विठ्ठल मंदिरात पोहचले. या वेळी नागरिकांनीही विद्यार्थ्यांच्या दिंडीचा आनंद घेतला. या विद्यार्थ्यांनी दहिवलीच्या विठ्ठल मंदिरात भजन आणि अभंगाचा कार्यक्रम सादर केला. या वेळी मंदिराच्या सदस्यांनी वह्या वाटप करून मुलांना प्रोत्साहन दिले. शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली किसवे, शिक्षक प्रफुल्ल देशमुख, श्रद्धा जामघरे, विजय सावंत, कार्यालयीन कर्मचारी शरद उतेकर, निशा गाढे आदि उपस्थित होते.


**जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. १ करीता)**

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./३१/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ
टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

अरमान महिला बचत गट
१) सौ. साबिरा अन्सार तांबोळी, अध्यक्षा
पत्ता :- कुंभारआळी, नेरळ, घर नं. १५,
राही हॉटेलच्या मागे, नेरळ,
ता- कर्जत, जि- रायगड - ४१० २०१
२) सौ. योगिता यशवंत कनोजे - सचिव
पत्ता :- भडवल, पंचशिल नगर,
घर नं. ६१३, पो - नेरळ,
ता- कर्जत, जि- रायगड - ४१० २०१
३) सौ. परवीन अस्लम तांबोळी
पत्ता :- ममदापूर, जुनी बाजारपेठ, मशिदजवळ,
पो - नेरळ, ता- कर्जत, जि- रायगड - ४१० २०१
४) सौ. मिनाज मुस्तफा जळगावकर
पत्ता :- जुनी बाजारपेठ, नेरळ, राममंदिराजवळ,
पो - नेरळ, ता- कर्जत, जि- रायगड - ४१० २०१ } **प्रतिवादी**

**दावा रुपये २,५१,४६३/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०६/०८/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १२/०७/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

# मराठी माणसाने उद्योजक बनण्याची तयारी ठेवावी

## केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे नवी मुंबईत आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी माणसाने उद्योजक बनण्याची मानसिकता तयार केली पाहिजे, असे आवाहन केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केले. ते नवी मुंबईत मराठी उद्योजकता दिवसाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ना. नारायण राणे म्हणाले, राजनाथ सिंग यांच्या फोननंतर उध्दव ठाकरे रागावले असल्याचे कोणी पाहिले. ते एकटेच घरात होते. फार फार त्यांच्या पत्नीने पाहिले असेल. राजनाथ सिंग संरक्षणमंत्री आहेत. उध्दव ठाकरे कोण आहेत, काय त्यांचे अस्तित्व. त्यांना इतरांकडे हात जोडत फिरावे लागत असल्याचं सांगत ना. राणे यांनी उद्धव ठाकरे यांची खिल्ली उडवली.



केंद्रीय मंत्री झाल्यावर एक वर्ष झालेय. सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग हे खात माझ्याकडे आहे. एका उद्योजकाच्या प्रतीक्षेत होतो, पण या ठिकाणी खूप सारे उद्योजक आहेत. हा उपक्रम उपयुक्त आहे. मराठी माणसाने उद्योजक व्हायची हिंमत केली पाहिजे. जे प्रशिक्षण घेतील, त्यांना कामांमध्ये प्राधान्य दिले जाईल. केलेच पाहिजे हा धर्म आहे. माझ कर्तव्य मी निभावणार. रोज शपथा घेऊन चालत नाही. त्या मनापासून केल्या पाहिजे. मराठी माणसाने अनेक गोष्टी इतर भाषिकांकडून शिकल्या पाहिजे. पैसा मिळवा. मग स्वतंत्र व्यवसाय करा. चेंबूरला व्यवसायिकांचे गुण मी पाहिजे. व्यवसायासाठी गोड बोलता आले पाहिजे. देशात सहा कोटी तीस लाख उद्योजक आहेत. त्यात मराठीचा टक्का कमी आहे. तो वाढविण गजरचे असल्याचे ना. राणे कार्यक्रमात बोलताना म्हणाले.

या वेळी मनोज भटीर, रामदार माने, अशोक दोगाडे, विनित बनसोडे यांच्यासह मराठी उद्योजक प्रचंड संख्येने सभागृहात उपास्थित होते.

**मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होणार**

मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होणार असल्याचे ना. राणे म्हणाले. मंत्रिमंडळ झालेय, ते लवकरच घोषित केले जाईल, असे सांगून संजय राऊत, उद्धव ठाकरे यांच्या प्रश्नाला मी उत्तर देणार नाही, कारण आज ते कोणी नाहीत, असे राणे म्हणाले.

# नवी मुंबईत पावसाचे थैमान

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबईत मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. मंगळवारी रात्रीपासून पावसाचा जोर आणखी वाढला आहे. गेल्या २४ तासांत नवी मुंबईत सरासरी ८४.६८ मिमी पाऊस झाला. यामुळे एपीएमसी मसाला मार्केट आणि महापे एमएसआरडीसी ते इंदिरा नगर येथील सखल भागात पाणी साचले आहे. पाण्याचा निचरा करण्यासाठी महापालिका आपत्ती व्यवस्थापनच्या कर्मचाऱ्यांकडून प्रयत्न सुरू होते.

वाऱ्यासह पडणाऱ्या पावसात नेरूळ आणि बेलापूर रस्त्यावरील झाडे मोठ्या फांद्या उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या पहाटेपासून संततधार घडणाऱ्या पावसामुळे हवेत गारठा निर्माण झाला होता. पावसामुळे दिवसभर नागरिकांची ये-जा कमी असल्याचे पहावयास मिळत होते. महामार्गावरून धिम्यागतीने वाहतूक सुरू होती.

दोन ठिकाणी झाडे कोसळली तर एका ठिकाणी आग लागण्याची घटना घडली. मोरबे धरण क्षेत्रात ९२.२० मिमी पावसाची नोंद झाली आहे. मोरबे धरणाची पातळी ७६.५७ मीटरपर्यंत पोहचली आहे. सर्वाधिक पाऊस कोपरखैरणे येथे झाला. तर बेलापूर, नेरूळ, वाशी, ऐरोली आणि दिघा विभागातही मुसळधार पाऊस झाला.

पहाटेपासून सलग पडत असलेल्या पावसामुळे गृहिणी, ज्येष्ठ नागरिकांनी कामाव्यतिरिक्त अन्य वेळी आपल्या घरीच राहणे पसंत केले. रस्त्यावर वाहनांची संख्यादेखील तुरळक होती.

# नेरूळ सेक्टर २०मध्ये अपुरा पाणीपुरवठा

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ गाव सेक्टर २० परिसरात मागील काही दिवसांपासून पाण्याची समस्या भेडसावत आहे. अपुऱ्या आणि कमी वेळ, कमी दाबाने होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. यासाठी भाजपचे माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे यांनी मुख्य शहर अभियंत्यांना भेटून निवेदन देत पाणी समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी केली.

धरण क्षेत्रातदेखील समाधानकारक पाऊस पडल्याने जलसाठा वाढला आहे. असे असतानाही नवी मुंबई शहर हे तहानलेले जाणवत आहे. अनेक भागात पाणी समस्या आहे. नेरूळ सेक्टर २० मध्येदेखील पाणी समस्येने नागरिका हवालदील झाले आहेत. त्यामुळे भविष्यात उद्भवणाऱ्या जनाक्रोशाची ठिणगी पडण्याचा इशारा माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे यांनी दिला. शहर अभियंता संजय देसाई यांनी तातडीने संबंधित अधिकारी कर्मचारी वर्गाला सूचना करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यासंबंधी आदेश दिले.

निवेदन देतेवेळी सामाजिक कार्यकर्ते शेखर भोपी, गणपतबुवा भोपी, देवनाथ म्हात्रे, अक्षय पाटील, एम. एन. पाटील, वनराज म्हात्रे, चंद्रवदन म्हात्रे, नारायण भोईर, भालचंद्र म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, कुमार पाटील, संदेश गायकवाड, सहयोग म्हात्रे, आशिष म्हात्रे, साई म्हात्रे, आशिष कडू आदी नेरूळ गावातील नागरिक उपस्थित होते.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अॅड-मॅड शो स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने अॅड-मॅड शो या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा बुधवारी (दि.१३) सकाळी १० ते १ च्यादरम्यान आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेमधे महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपल्या विशिष्ट कला व सर्जनशीलतेचे प्रदर्शन करून विविध प्रकारच्या जाहीराती सादर केल्या. कार्यक्रमाचे आयोजन वाणिज्य विभागप्रमुख नम्रता गजरा यांनी केले. तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. नम्रता पारिक व सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हे कार्यक्रम यशस्वीरित्या होण्यासाठी मेहनत केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या कार्यक्रमामध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांना



प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षच्या समन्वयक महेश्वरी झिरपे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षकांचे कौतुक केले. तसेच स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# सानपाड्यात आरोग्यपर जनजागृती शिबिराचे आयोजन करा -पांडुरंग आमले

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा नोड येथील प्रभाग ३०मधील रहीवाशांच्या माहितीसाठी आरोग्यपर जनजागृती शिबिराचे आयोजन करण्याची लेखी मागणी भाजपचे युवा नेते पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे निवेदनातून केली आहे.

प्रभाग ३० मध्ये सानपाडा कारशेड, सानपाडा नोडमधील सेक्टर १२,२,७, ८,९, १० (काही भाग), सेक्टर ११ ,१५, १६, १६ ए, १७, १८, १९, २०, जुईनगर रेल्वे स्थानक व इतर परिसराचा समावेश होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून गेल्या काही दिवसापासून संततधार पाऊस पडत आहे. या दिवसांमध्ये मलेरिया, ताप, हिवताप, डेंग्यू, लेप्टोस्पायरोसिस आदी साथीच्या आजारांचा प्रभाग ३० मधील परिसरात उद्रेक होवून रुग्ण वाढीची संख्या पहावयास मिळते. त्यातच आता गेल्या काही दिवसांपासून कोरोना रुग्णांचेही प्रमाण वाढीस लागले आहे. जवळच्या मुंबई शहरात ओमायक्रॉनचे रूग्ण अढळून येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रभाग ३० मधील गृहनिर्माण सोसायट्यांतील रहिवाशांनी आजार होऊ नये यासाठी काय काळजी घ्यावी, आजार झाल्यावर काय करावे, आजाराची लक्षणे काय आहेत, आजार अंगावर काढल्याने कितपत हानी होते. आजाराची साथ कशामुळे निर्माण होते. साथीचे आजार, कोरोना, ओमायक्रॉन या आजारांचा सामना कसा करावा, याबाबत प्रभाग ३० मधील रहीवाशांना महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून मार्गदर्शन होणे आवश्यक आहे.


प्रभाग ३० मध्ये महापालिकेचे पूर्वीचे तीन प्रभाग समाविष्ट झाले असल्याने प्रभाग ३० मध्ये तीन ठिकाणी तीन दिवस मार्गदर्शनपर आरोग्य जनजागृती शिबिराचे आयोजन करण्याचे संबंधितांना निर्देश देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. यापूर्वीही पांडुरंग आमले यांनी १५ जुन २०२२ रोजी याच विषयावर महापालिका आयुक्तांना निवेदन सादर केले होते.

# पोलिसांकडून विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे व ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेच्या कांबे व चांभार्ली येथील शाळांतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रम व विद्यार्थ्यांना पोलीस काका आणि पोलीस दीदी संकल्पनेबाबत माहिती देण्यात आली.

रायगड पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला, रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे व



ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कांबे व चांभार्ली जिल्हा परिषद शाळेत वह्या वाटप कार्यक्रम राबविण्यात आला.

या वेळी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे, ऑल इंडिया पोलीस जनसेवा संघटनेचे महाराष्ट्र सचिव गणेश थोरवे, रायगड जिल्हा अध्यक्ष सागर काशिनाथ कुरंगळे, पोलीस शिपाई जाधव मॅडम, पोलीस नाईक विशाल झावरे, सचिन गोंधळी, रोशन गोंधळी, मयूर डुकरे, सुशील कुरंगळे, सुनील कुरंगळे, मनिष कुरंगळे, बाळकृष्ण कुरंगळे, सचिन कुरंगळे, मनिष कुरंगळे, जीवन कुरंगळे आदी उपस्थित होते.



**पनवेल : ज्येष्ठ आयुर्वेदाचार्य डॉ. भक्तीकुमार दवे यांना वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी शुभेच्छा दिल्या.**

# पावसात पडलेली झाडे हटविली


## कामोठ्यात नगरसेवक विकास घरत यांची तत्परता

**पनवेल : वार्ताहर**

मुसळधार पावसामुळे कामोठे वसाहतीमध्ये अनेक वृक्ष रस्तावर उन्मळून पडल्याने अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला होता. या वेळी नगरसेवक विकास यांनी त्या ठिकाणी जाऊन पडलेली झाडे हटविण्यासाठी पनवेल महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून ती झाडे स्वतः जागेवर उभे राहून हटवून घेतली आहेत.

कामोठे वसाहतीमधील सेक्टर ३४ स्वामी समर्थ मठ आणि सेक्टर ३५मध्ये अतिपावसामुळे काही झाडे पडली होती. याची माहिती स्थनिक रहिवाशंनी नगरसेवक विकास घरत यांना दिली. त्यानुसार घरत यांनी त्वरित तेथे येऊन पनवेल महानगरपालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधून स्वतः जाऊन ती झाडे रस्त्यातून काढून घेतली. त्याबद्दल स्थानिक रहिवाश्यांनी नगरसेवक घरत यांचे आभार मानले आहेत.





# रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या प्रांतपालपदी डॉ. अनिल परमार



**पनवेल : वार्ताहर**

रोटेरियन डॉ. अनिल परमार यांनी पनवेलच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे प्रांतपाल म्हणून सुत्रे स्विकारली. मावळते प्रांतपाल रोटेरियन पंकज शहा ह्यांनी डॉ अनिल ह्यांना प्रांतपालपदाची कॉलर घातली.

या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, आंतरराष्ट्रीय रोटरी फाऊंडेशनचे प्रमुख ट्रस्टी डॉ. भरत पंड्या, आंतरराष्ट्रीय रोटरीचे डायरेक्टर डॉ. महेश कोटबागी, माजी प्रांतपाल रवी वडलामानी व रोटरी जगतातील बरेच सन्माननीय सदस्य व ६०० हून अधिक पुणे व पनवेल विभागातील रोटेरियन उपस्थित होते. रोटरी फाऊंडेशनला भरघोस आर्थिक पाठबळ देणाऱ्या देणगीदारांचे सत्कार या वेळी करण्यात आले.

# कोकणात दमदार पावसाची नोंद

**नवी मुंबई :** कोकण विभागात बुधवारी (दि.१३) सरासरी ६१.४ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद पालघर जिल्ह्यात ७४.६ मि.मी. झाली आहे.

ठाणे ७०.८ मि.मी., पालघर ७४.६मि.मी, रायगड ७२.७मि.मी., रत्नागिरी ५८.३ मि.मी., सिंधुदुर्ग ३१.८ मि.मी. अशी जिल्हा निहाय पावसाची आकडेवारी आहे. मागील वर्षी दि. १३ जुलै २०२१ रोजी ७७९.२ मि.मी पावसाची नोंद झाली होती.

# इनरव्हील क्लब ऑफ गॅलेक्सी न्यू पनवेलच्या अध्यक्षपदी साधना धारगळकर

**पनवेल : वार्ताहर**

इनरव्हील क्लब ऑफ गॅलेक्सी न्यू पनवेलच्या झालेल्या पदग्रहण समारंभात अध्यक्षपदी साधना धारगळकर यांची निवड झाली.

सेक्रेटरीपदी ममता राजीवन, व्हाईस प्रेसीडेंटपदी डॉ.शितल फरांडे, खजिनदारपदी भूमिका परमार, आयएसओ लता शहा, एडीटर अर्चना राजे, जॉईंट सेक्रेटरी सिध्दी लोखंडे, प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर कल्पना कोठारी तर सल्लागार समितीमध्ये अरूणा आचरेकर, सिमा दाहेदार, प्रिती जेटीया, उल्का धुरी, अॅड. स्नेहल वाडकर यांची निवड



करण्यात आली.

नवीन वर्षाचे नवीन सदस्य प्रिती जॉर्ज म्हात्रे, शितल ठक्कर, जयश्री साळवे, निता कोटक, कविता ठाकूर, रश्मी माणिकपूर, संविधा पाटकर, मंजुश्री दावकर, विद्या चव्हाण, सीमा बुटाला, सिद्धी मुणोथ, निकिता काळे, शितल वळंजू, सुनिता गुजर, शमा गांधी, निशा बालड यांचे स्वागत करण्यात आले.

मावळत्या अध्यक्षा सुनिता आडमुठे यांनी वर्षभर केलेल्या सहकार्याबद्दल सर्व सदस्यांचे आभार मानले. नूतन अध्यक्षा साधना धारकर यांनी पुढील वर्षाच्या प्रकल्पाची माहिती दिली. या वेळी गतवर्षीचा अहवाल खजिनदार लता शहा यांनी वाचला तर उपस्थितांचे आभार व्हाईस प्रेसिडेंट शितल फरांडे यांनी मानले.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**

*अ.* ब्लॉकचेन — *आ.* मेटा
*इ.* गुगल — *ई.* फाईव जी

**२. भारतात टपाल कार्यालयांची एकूण संख्या किती आहे?**

*अ.* दोन लाख — *आ.* दीड लाख
*इ.* एक लाख — *ई.* चार लाख

**३. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त म्हणजे २०२३ च्या स्वातंत्र्यदिनीकोणत्या ७५ रेल्वेगाड्या सुरु करण्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे?**

*अ.* राजधानी — *आ.* तेजस
*इ.* हमसफर — *ई.* वंदे भारत

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# अंबा नदीने ओलांडली धोक्याची पातळी

## ▪ पाली पुलावर सलग दुसऱ्या दिवशी आले पाणी
## ▪ वाहनांच्या लांब रांगा, प्रवासी व विद्यार्थ्यांचे हाल

**पाली : प्रतिनिधी**

दोन दिवसांपासून कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे अंबा नदीने धोक्याची पातळी ओलांडली. परिणामी वाकण–पाली–खोपोली राज्य महामार्गावर पाली जवळील अंबा नदी पुलावरून मंगळवारी दुपारी १२ नंतर पाणी गेले होते. ते तब्बल ९ तासांनी म्हणजे रात्री ९ वाजल्यानंतर ओसरले होते. मात्र बुधवारी (दि. १३) पावसाचा जोर वाढल्यानंतर दुपारी एक वाजता पुन्हा या पुलावरून नदीचे पाणी गेले. सलग दुसऱ्या दिवशीही पुलावरून पाणी गेल्याने येथील वाहतूक खोळंबून प्रवासी, चाकरमानी, विद्यार्थी पुलाच्या दोन्ही बाजूस अडकून पडले. तसेच रस्त्यावर वाहनांच्या लांब रांगा लागल्या होत्या.

मुसळधार पावसामुळे सुधागड तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. पालीतून नागोठणे व सुकेळी येथील शाळेत गेलेले १०० हुन अधिक विद्यार्थी मंगळवारी पुलाच्या पलीकडे ७ ते ९ तास अडकून पडली होती. ती मुले रात्री नऊनंतर पालीला आपल्या घरी पोहचली. त्यामुळे पालक खूप चिंतातूर झाले होते, असे पालीतील डॉ. मयूर कोठारी यांनी सांगितले. शिवाय खेडेगावातून पालीला शाळेत व महाविद्यालयात आलेल्या विद्यार्थ्यांनादेखील सलग दुसऱ्या दिवशी अडकून पडावे लागले, असे शिक्षक शरद निकुंभ यांनी सांगितले.





(छाया : धम्मशील सावंत)

पालीचे पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबा नदी पुलाच्या दोन्ही बाजूला चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पुलावरून पाणी जात असताना कोणीही पुलावरून प्रवास करू नये, अशी सूचना तहसीलदार दिलीप रायणावर यांनी दिली आहे.

वाकण–खोपोली राज्य महामार्गावरील पाली येथील अंबा नदी पुल मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाला जोडतो. तसेच दक्षिण कोकणातून पुणे व मुंबईला मुंबई–पुणे द्रुतगती मार्गाने जाणारी वाहने याच मार्गावरून जातात. पाली येथील अंबा नदी पुलावरून पाणी गेल्याने हे प्रवासी व वाहने दोन्ही बाजूस अडकून पडली असून त्यांची गैरसोय झाली.

### नवीन पूल अपूर्ण

*अंबा नदीवरील पूल जुना अरुंद व कमी उंचीचा आहे. या पुलाच्या बाजूला नव्याने मोठा पूल बांधण्यात येत आहे. मात्र कामातील दिरंगाई व संथ गतीने सुरू असलेल्या कामामुळे या पुलाचे काम अपूर्ण आहे. या पुलाचे काम वेळीच पूर्ण झाले असते तर प्रवासी व विद्यार्थ्यांचा खोळंबा व गैरसोय झाली नसती.*

**अंबा नदी पुलावरून पाणी गेल्यामुळे पलीकडे खोळंबून रहावे लागते. त्यात अनेक प्रवाशांचे हाल होतात. प्रवासी व वाहने अडकून पडतात. विद्यार्थी व चाकरमान्यांना सर्वाधिक फटका बसतो.**
**–संतोष भोईर, शिक्षक, पाली, ता. सुधागड**

# खोपोलीत अफवांचा पूर; सुरक्षा यंत्रणांची धावपळ

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात पूरस्थिती निर्माण झाली असताना अफवांचादेखील पूर आला असून त्यामुळे आपत्कालीन यंत्रणांची बुधवारी (दि. १३) चांगलीच धावपळ झाली.

खोपोली शहराच्या रहाटवाडा या परिसरात असणाऱ्या पुलावरून दोन मुले वाहून गेल्याची वार्ता शहरात वाऱ्यासारखी पसरली. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य गुरुनाथ साठेलकर, विजय भोसले, अमोल कदम, सुनील पुरी, योगेश औटी, भक्ती साठेलकर तातडीने तेथे पोहचले. खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, खोपोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक हरीश काळसेकर, खोपोली अग्नीशमन दलाचे अधिकारी हरी सूर्यवंशी हेदेखील दाखल झाले.

खोपोली पोलीस ठाण्याचे, महसूल विभागाचे व खोपोली नगरपालिकेचे कर्मचारी इत्यादींनी अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या सदस्यांसोबत संपूर्ण परिसर पिंजून काढला. हनिफ कर्जीकर, अमोल ठक्कर, दिनेश ओसवाल, धवल भानुशाली, राजेश पारठे, अमित गुजरे यांनी जागोजागी नदीच्या प्रवाहावर लक्ष ठेवले. तहसीलदार आयुब तांबोळी यांनी सर्व अधिकाऱ्यांसोबत चर्चा करुन सुरक्षा यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांना सतर्क रहण्याचे निर्देश दिले आणि नागरिकांना अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर सतर्क रहावे असे आवाहन केले आहे.



(छाया : विनायक माडपे)



(छाया : शैलेश पालकर)

## कशेडी घाटात अपघात; चोळई गावाजवळ ट्रक उलटला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कशेडी घाटातील चोळई गावाजवळील वळणावर बुधवारी (दि. १३) पहाटेच्या सुमारास ट्रक पलटी झाला. या अपघातात कलंडलेल्या ट्रकचे तुकडे झाले.

चालक सुनील सोपान वाघमारे हा आपल्या ताब्यातील ट्रक (एमएच–४३,जे–९८५५) घेऊन मुंबई–गोवा महामार्गावरून कल्याणकडे येत होता. कशेडी घाटातील चोळई गावच्या हद्दीत पहाटे चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्याच्या विरुध्द दिशेस जाऊन दोन वेळा पलटी झाला. या अपघातात ट्रकचे तुकडे तुकडे झाले. चालक सुनील वाघमारे जखमी झाले असून, त्यांना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

# खालापुरातील शाळांना दोन दिवस सुटी

**खालापूर : प्रतिनिधी**

मागील चार दिवस पावसाने घुमशान घातले असून बुधवारी (दि. १३) गुरुपौर्णिमेच्या दिवशी सतत मुसळधार पाऊस कोसळत असल्याने खालापूर, खोपोली, रसायनी, मोहपाडा, चौक, वावोशी परिसरातील नद्या व नाले तुडुंब भरून वाहत आहेत. तर काही मार्ग पाण्याखाली गेले आहेत. खोपोली–पाली मार्गावरील पुलावरून पाणी गेले तर काही ठिकाणी मार्गाच पाण्याखाली गेल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

अंबा नदी पुलावरून पाणी वाहत असल्याने गेल्या दोन दिवसापासून तुकसाई गावाचा संपर्क तुटला आहे. मोहपाडा येथील रस्ता खचला असल्याने खबरदारी घेतली जात आहे. तर झाड पडल्याने खोपोलीतील मिल गावाकडे जाणारा रस्ता बंद झाला आहे.

दरम्यान, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनूप दुरे यांच्यासह पोलीस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांनी खोपोली परिसरातील काटरंग, भानवज, विणानगर, क्रांतीनगर येथील नाल्यांची पाहणी केली तर झेनीथ धबधबा येथे जाऊन परिस्थिती जाणून घेतली.

हवामान खात्याने बुधवार व गुरुवारी जोरदार पर्जन्यवृष्टी होण्याचा इशारा दिला असल्याने शाळांना दोन दिवस सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. नागरिकांनी अनावश्यक घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



(छाया : अरूण नलावडे)

# गणेशभक्तांसाठी मध्य रेल्वे सरसावली

## ▪ रोहा–चिपळूणदरम्यान ३२ मेमू धावणार

**रोहे : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या सोयीकरता मध्य रेल्वे सरसावली असून या काळात रोहा ते चिपळूण या दरम्यान ३२ मेमू गाड्या धावणार असल्याची माहिती मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी प्रविण पाटील यांनी दिली. त्यामुळे गणेशभक्तांच्या कोकणातील प्रवास सुखकर होणार आहे.

मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण परिसरातील चाकरमान्यांना गणेशोत्सवासाठी आपल्या गावी जाण्याची ओढ असते. त्यासाठी ते दोन महिने आधीपासून तयारीला लागतात. २०२२ च्या गणपती उत्सवादरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे रोहा ते चिपळूणदरम्यान ३२ मेमू गाड्या चालवणार आहे. या ३२ जादा गाड्यांमुळे २०२२ मध्ये गणपती विशेष गाड्यांची एकूण संख्या १९८ होईल.





(छाया : महादेव सरसंबे)

या जादा मेमू गाड्यांसाठी रोहा ते चिपळूण दरम्यान माणगांव, वीर, करंजाडी, विन्हेरे आणि खेड हे थांबे असून सुपरफास्ट मेल/एक्स्प्रेस ट्रेनसाठी लागू असलेल्या मेमू ट्रेनसाठी यूटीएस सिस्टमद्वारे तिकिटे बुक केली जाऊ शकतात. या मेमू ट्रेनच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी www.enquiry.indianrail.gov.in किंवा NTES n डाऊनलोड केल्यास प्रवाशांना अधिक माहिती मिळणार आहे.

### गणपती विशेष मेमू गाड्यांचे वेळापत्रक

**रोहा ते चिपळूण**
**(गाडी नंबर ०११५७)**

**१९ ते २१ ऑगस्ट, २७ ऑगस्ट ते ५सप्टेबर आणि १० ते १२ सप्टेबर (एकूण १६ सेवा) रोहा येथून रोज ११.०५ वाजता सुटेल आणि चिपळूण येथे त्याच दिवशी १३.२० वाजता पोहोचेल.**

**चिपळूण ते रोहा**
**(गाडी नंबर ०११५८)**

**चिपळूण येथून १९ ते २१ ऑगस्ट, २७ ऑगस्ट ते ५ सप्टेबर आणि १० ते १२सप्टेबर (१६ सेवा). चिपळूण येथून रोज १३.४५ वाजता सुटेल आणि रोहा येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.**

## पेणमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**पेण : प्रतिनिधी**

विद्यार्थी हे देशाचे उद्याचे उज्ज्वल भविष्य असून त्यांनी शिक्षणाबरोबर सामाजिक संस्थांचा अभ्यास करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे प्रदेश सरचिटणीस सुशिल वाघमारे यांनी येथे केले.

पेण तालुका भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने येथील महात्मा गांधी वाचनालयात तालुक्यातील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी सुशिल वाघमारे उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. विद्यार्थ्यांनी शिक्षणामध्ये उंच भरारी घेऊन आपले नाव लौकिक करावे, असे त्यांनी या वेळी सांगितले.

बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड, सरचिटणीस विजय कांबळे, र. ना. कांबळे, प्रा. एल. एन. कुमारे, तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनवणे, माजी नगरसेवक पांडुरंग जाधव, माजी नगरसेविका प्रतिभा जाधव, बौद्धाचार्य मारुती शिंदे आदींसह विद्यार्थी व पालक या वेळी उपस्थित होते. सचिन कांबळे, मंगेश कांबळे, नरेश गायकवाड, मनोज शिंदे आदींनी कार्यक्रम यशस्वी केला.

# माथेरान पालिकेतील १० कर्मचारी सेवेत कायम

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

माथेरान नगर परिषदमधील दहा हंगामी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात आले आहे. त्यांना मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या नियुक्ती पत्रे देण्यात आली. त्यात आठ सफाई कामगार आणि दोन कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

माथेरान नगर परिषदेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात काम करणारे हे दहा कर्मचारी सेवेत कायम करावे, यासाठी मागील सात वर्षांपासून पाठपुरावा करीत होते. त्यांच्या मागणीनुसार पालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठरावही घेतला होता. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर या सर्व कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात आले. मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्रेही देण्यात आली.



(छाया : विजय मांडे)

**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
**CORRIGENDUM TO TENDER NOTICE**
**No: - PMC/CE/PMAY/14/2022-23**
**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**
**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF "CONSTRUCTION OF HOUSING COMPLEX UNDER PRADHANMANTRI AAWAS YOJANA" (PMAY)**

Date : 13/07/2022

Corrigendum No. 3

**Tenderers should note the following changes in connection with this tender.**

| Name of work | Corrigendum |
|---|---|
| Survey, Planning, Designing, Building Construction, Obtaining All Relevant Permissions, Required Completion/ Occupancy Certificate from Concerned Local Authority On Lump-Sum Turnkey Basis for Construction of Affordable Housing Under Pradhan Mantri Awas Yojana (Urban) For Rehab and Free Sale Dwelling Units EWS - 618 & LIG - 150 With Commercial Component of 126 Shops in Panvel Municipal Corporation (PMC) Area. | **1) Last date of submission for this tender is extended up to- 29/07/2022.** **2) Date of Opening & scrutiny of technical bid - 01/08/2022** **3) Date of Opening financial bid- after 01/08/2022** **4) Clarifications to bidders queries are attached with this corrigendum.** **5) This corrigendum will be the part of tender documents.** |

All other terms and conditions will remain unchanged.

**Sd/-**
**Deputy Commissioner,**
**Panvel Municipal Corporation,**
**Panvel - 410 206**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना
## (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे–उलवे, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भुधारक **१) श्री. रामभाऊ बालाजी भगत व इतर** यांचे कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

**१.भूखंडांचा तपशील पुढीलप्रमाणे:**

| संचिका क्र. /नोड | निवाडा क्र. | संपादित सर्व्हे क्र. / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे. आर) | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| संचिका क्र. २००/उलवे | २०४ | २७/२<br>४०/५<br>४१/१ | ०–६२–०<br>०–२३–९<br>०–१२–७ | उलवे | २९ | १९ | ७५० चौ.मी. प्रस्तावित |

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार साडेबारा टक्के योजनेअंर्तगत भूधारकांना उलवे नोड येथील भुखंड क्र.२९, सेक्टर–१९, क्षेत्र–७५० चौ.मी. भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या भूधारक **१) श्रीमती अनुबाई ऊर्फ अनुसया काना केणी** २) **श्री. महेश प्रमोद पाटील ३) श्री. विश्वास प्रमोद पाटील ४) श्रीमती राजश्री प्रमोद पाटील ऊर्फ प्रसिध्दी प्रविण कासकर ५) श्रीमती भाग्यश्री प्रमोद पाटील ऊर्फ भाग्यश्री दत्तात्रेय पाटील ६) श्रीमती मिनाबाई सिताराम भगत ७) श्रीमती सुजाता सिताराम भगत ऊर्फ सुजाता धनाजी भगत ८) श्रीमती गंगाबाई अनंत ऊर्फ अनंता भगत ९) श्रीमती वैशाली दत्तात्रेय गोवारी १०) श्रीमती इंद्रा निलेश गोवारी ११) श्रीमती रोशनी उमेश सुरते** यांनी सह दुय्यम निबंधक, पनवेल यांच्याकडे हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ **१) श्री. भगवान रामभाऊ भगत २) श्री. विनोद सिताराम भगत ३) श्री. दिनेश सिताराम भगत ४) श्री. श्रीधर सिताराम भगत ५) श्री. सागर अनंत ऊर्फ अनंता भगत** यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहे. सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट – १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१०अ**' मधील मूद्दा क्र. **ii** अन्वये संबंधीत हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र., सेक्टर क्र., व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे हक्कसोडपत्रामध्ये इरादित **भूखंड क्र. २९, सेक्टर–१९, क्षेत्र–७५० चौ.मी.** भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे तरघर, निवाडा क्र. २०४, सं.नं/हि.नं– २७/२, ४०/५, ४१/१, एकूण क्षेत्र–०–९८–६ हे.आर. या संपादित जमिनीचा उल्लेख केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| १) श्रीमती अनुबाई ऊर्फ अनुसया काना केणी | १) श्री. भगवान रामभाऊ भगत |
| २) श्री. महेश प्रमोद पाटील | २) श्री. विनोद सिताराम भगत |
| ३) श्री. विश्वास प्रमोद पाटील | ३) श्री. दिनेश सिताराम भगत |
| ४) श्रीमती राजश्री प्रमोद पाटील ऊर्फ प्रसिध्दी प्रविण कासकर | ४) श्री. श्रीधर सिताराम भगत, |
| ५) श्रीमती भाग्यश्री प्रमोद पाटील ऊर्फ भाग्यश्री दत्तात्रेय पाटील | ५) श्री. सागर अनंत ऊर्फ अनंता भगत |
| ६) श्रीमती मिनाबाई सिताराम भगत | |
| ७) श्रीमती सुजाता सिताराम भगत ऊर्फ सुजाता धनाजी भगत | |
| ८) श्रीमती गंगाबाई अनंत ऊर्फ अनंता भगत | |
| ९) श्रीमती वैशाली दत्तात्रेय गोवारी | |
| १०) श्रीमती इंद्रा निलेश गोवारी | |
| ११) श्रीमती रोशनी उमेश सुरते | |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोडनुसार सिडकोकडून केवळ खालील नमूद केलेल्या व्यक्तिच भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|
| १) श्री. भगवान रामभाऊ भगत |
| २) श्री. विनोद सिताराम भगत |
| ३) श्री. दिनेश सिताराम भगत |
| ४) श्री. श्रीधर सिताराम भगत, |
| ५) श्री. सागर अनंत ऊर्फ अनंता भगत |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार यापुढे साडेबारा टक्के योजनेसंदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३०(तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही, असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधित गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल, अशा ठिकाणी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/१५८/२०२२–२३

# टीम इंडियाची विजयी सलामी

## पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडवर दणदणीत मात

### बुमराहच्या भेदक गोलंदाजीनंतर दोन्ही सलामीवीर बरसले



**लंडन : वृत्तसंस्था**

वेगवान गोलंदाज जसप्रित बुमराहच्या भेदक माऱ्यामुळे भारताने मंगळवारी पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडवर १० गडी राखून विजयी सलामी नोंदवली. बुमराने ७.२ षटकांत १९ धावांत सहा बळी घेत इंग्लंडचा डाव फक्त ११० धावांत गुंडाळला. मोहम्मद शमीने (३/३१) त्याला उत्तम साथ दिली. मग कर्णधार रोहित शर्मा (५८ चेंडूंत नाबाद ७६ धावा) आणि शिखर धवन (५४ चेंडूंत नाबाद ३१ धावा) यांनी १८.४ षटकांत ११४ धावा करीत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी मिळवली आहे.

इंडियन प्रीमियर लीगनंतर (आयपीएल) प्रथमच स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये खेळणाऱ्या धवनला लय गवसण्यास थोडा वेळ लागला. १७ चेंडूंत त्याने फक्त दोन धावा केल्या होत्या, परंतु रीसी टॉपलेच्या गोलंदाजीवर दोन सलग चौकार खेचल्याने त्याचा आत्मविश्वास परतला. दुसरीकडे रोहितने आक्रमक फटकेबाजी करीत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. रोहितने सात चौकार आणि पाच षटकारांची आतषबाजी केली. यापैकी क्रेग ओव्हर्टनच्या गोलंदाजीवर मारलेले पुलचे फटके डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. यातील एक षटकार आणि एक चौकार ठरला. ब्रायडन कर्सीला हुकद्वारे षटकार खेचत रोहितने अर्धशतक साकारले. मग कर्सीला आणखी एक षटकार मारला. धवनच्या चौकाराने भारताने शानदार विजयाची नोंद केली.

तत्पूर्वी भारताचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर बुमराहने कारकीर्दीतील सर्वोत्तम गोलंदाजीची कामगिरी करीत तो सार्थ ठरवला. बुमराहने डावाच्या दुसऱ्याच षटकात जेसन रॉय आणि जो रूट यांना अनुक्रमे चौथ्या आणि सहाव्या चेंडूवर शून्यावर बाद केले. मग शमीने बेन स्टोक्सलाही भोपळा फोडू दिला नाही. त्यामुळे ३ बाद ७ अशी इंग्लंडची त्रेधातिरपीट उडाली. मग बुमराने जॉनी बेअरस्टो (७) आणि लियाम लिव्हिंगस्टोन (०) यांना अनुक्रमे सहाव्या आणि आठव्या षटकात बाद करीत इंग्लंडची ५ बाद २६ अशी केविलवाणी अवस्था केली, परंतु कर्णधार जोस बटलर (३०), मोईन अली (१४), डेव्हिड विली (२१) आणि ब्रायडन कर्सी (१४) यांनी दोन आकड्यांत धावा केल्याने इंग्लंडला जेमतेम धावसंख्येच्या शतकाचा टप्पा ओलांडता आला. इंग्लंडकडून विली आणि कर्सी यांनी नवव्या गड्यासाठी ३५ धावांची भागीदारी केली. बुमराहने कर्सीचा त्रिफळा उडवत २५.१ षटकांत इंग्लंडचा डाव ११० धावांवर संपुष्टात आणला. त्याने सहापैकी चार फलंदाजांचा त्रिफळा उडवला.

# नागोठणे रिलायन्सच्या सात खेळाडूंची राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेसाठी निवड



(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण वॉटर पोलो स्पर्धेकरीता रायगड जिल्ह्यातील सात खेळाडूंची निवड महाराष्ट्र संघात झाली आहे. हे खेळाडू रिलायन्स इंडस्ट्रीज लि. नागोठणे येथील हेल्थ क्लब जलतरण तलावाचे जलतरणपटू आहेत.

स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ४९वी राष्ट्रीय जलतरण व वॉटर पोलो स्पर्धा १६ ते २० जुलैदरम्यान ओडिशातील भुवनेश्वर येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी प्रेषित तरे, सार्थक इंद्र, सुजल भोय, प्रेम पाटील, रोहित कुथे, दिनांशु कुथे, आदर्श म्हात्रे यांची निवड झाली आहे. या खेळाडूंनी उरी जिद्द बाळगत कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण सरावातून राष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. या सर्वांचे अभिनंदन होत आहे.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय जलतरण प्रशिक्षक दत्ता तरे, गितेश कुथे, रोशन कुथे, प्रेमराज पिंगळे यांनी मार्गदर्शन केले, तर रिलायन्स नागोठणे विभागाचे अध्यक्ष शशांक गोयल, विनायक किलोस्कर, उदय दिवेकर, इस्टेटचे मॅनेजर अजिंक्य पाटील, सतीश पाटील, अशोक विधाते, रायगड जिल्हा जलतलरण संघटनेचे अध्यक्ष राजू कोळी आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# रोहित शर्मा नवा 'सिक्सर किंग'

## गेल, आफ्रिदीला टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**



इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्या कर्णधार रोहित शर्माने नाबाद ७६ धावांची खेळी करून भारताच्या विजयात महत्त्वाचे योगदान दिले. आपल्या अर्धशतकादरम्यान त्याने सहा चौकार आणि पाच षटकार लगावले. अशी कामगिरी करून त्याने एकदिवसीय क्रिकेटमध्ये २५० षटकारांचा टप्पा पार केला.

रोहितने आपल्या फलंदाजीदरम्यान मारलेल्या षटकारांच्या जोरावर पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदी आणि वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलचा विक्रम मोडला. आफ्रिदीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये २५९ डावांमध्ये २५० षटकार मारले होते, तर गेलने २६८ डावांमध्ये हा टप्पा पार केला होता. रोहित शर्माने केवळ २२४ डावांमध्येच २५० षटकार पूर्ण केले. त्यामुळे रोहित हा सर्वांत कमी डावात २५० षटकार मारणारा पहिला फलंदाज ठरला. त्यामुळे त्याच्या नावावर नवा विश्वविक्रम नोंदला गेला आहे.

**बुमराहची अव्वल स्थानी झेप**

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात आपल्या गोलंदाजीने अर्धा संघ गारद करणारा जसप्रीत बुमराह वनडेत जगातील नंबर वन गोलंदाज बनला आहे. त्याने आयसीसीच्या एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थानी झेप घेतली आहे.

# कॅरम स्पर्धेत प्रशांत, काजलला विजेतेपद

**मुंबई : प्रतिनिधी**

विश्वविजेत्या मुंबईच्या प्रशांत मोरे आणि काजल कुमारी यांनी बंगाल क्लबतर्फे आयोजित राज्य मानांकन कॅरम स्पर्धेतील अनुक्रमे पुरुष व महिला एकेरी गटाचे विजेतेपद मिळवले.

पुरुष एकेरीत प्रशांतने तीन सेटपर्यंत रंगलेल्या अंतिम सामन्यात मुंबईच्या विकास धारियाला १८-९, १५-२५, १०-१५ असे नमवले. दोन सेटच्या बरोबरीनंतर तिसऱ्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंमध्ये चुरस पाहायला मिळाली. अखेर प्रशांतने विजय नोंदविला. दुसरीकडे महिला एकेरीच्या अंतिम लढतीत काजलने मुंबईच्या नीलम घोडकेवर २५-६, २२-११ असा एकतर्फी विजय मिळवला.

# भारताच्या शाहू माने-मेहुली घोषला 'सुवर्ण'

## विश्वचषक नेमबाजी स्पर्धा

**चँगवॉन : वृत्तसंस्था**





भारताच्या मेहुली घोष आणि शाहू तुषार माने यांनी विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक प्रकारात भारताला सुवर्णपदक जकून दिले. भारताचे हे स्पर्धेतील दुसरे सुवर्णपदक आहे. याचबरोबर भारताची दुसरी जोडी पलक आणि शिवा नरवाल यांनी १० मीटर एअर पिस्टलच्या मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.

जबरदस्त फॉर्ममध्ये असलेल्या मेहुली आणि शाहू यांनी हंगेरीची जोडी एझ्टर मेसझारोस आणि इस्तवान पेनचा १७-१३ असा पराभव केला. १० मीटर एअर रायफल मिश्र सांघिक प्रकारात तिसऱ्या स्थानावर इस्त्राईलची आणि चौथ्या स्थानावर चेक रिपब्लिकची जोडी राहिली.

शाहू मानेचे हे भारताकडून वरिष्ठ स्तरावरील पहिले सुवर्णपदक आहे, तर मेहुलीने आपले दुसरे सुवर्णपदक पटकाविले. यापूर्वी तिने २०१९च्या साऊथ एशियन गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकले होते.

मिश्र पिस्टल प्रकारात पलक आणि शिवा यांनी कझाकिस्तानच्या इरिना लोक्तीओनोव्हा आणि वॅलेरिये राखीमझानचा १६-० असा पराभव केला. हा सामना एकतर्फी झाला.

या सुवर्ण कामगिरीनंतर भारताने पदकतालिकेत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. सर्बिया दोन सुवर्ण आणि एक कांस्यपदक जिंकून पहिल्या स्थानावर आहे.

# जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत पेण तालुका चॅम्पियन



**पेण : प्रतिनिधी**

पनवेलजवळील खांदा कॉलनी येथील रायगड किकबॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग निवड चाचणी अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पेणमधील युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन या संस्थेत रवींद्र म्हात्रे, विनायक पाटील तसेच प्रथमेश मोकल यांच्याकडे किकबॉक्सिंगचे प्रशिक्षण घेत असलेल्या खेळाडूंनी ४५ सुवर्ण, ४३ रौप्य आणि १८ कांस्यपदके जिंकून प्रथम क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकाविण्याचा मान मिळविला.

स्पर्धेत संपूर्ण रायगड जिल्ह्यातील जवळपास ६०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे संपूर्ण आयोजन निलेश भोसले यांनी केले होते. रायगड जिल्ह्यातून प्रशांत घांगुर्डे, चिंतामणी मोकल, सागर कोळी, प्रतिक कारंडे, संजय पाटील, शैलेश खोब्रागडे, संजय गमरे, स्वप्नील वारंगे या सर्व प्रशिक्षकांनी आपापल्या तालुक्यातून खेळाडूंना खेळण्यासाठी आणले होते.

सर्व विजयी खेळाडूंची आळंदी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल सर्व खेळाडूंना महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष मंदार पनवेलकर यांच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## महिला विश्वचषक हॉकी स्पर्धा

# भारताची कॅनडावर शूटआऊटमध्ये मात



**तरासा (स्पेन) : वृत्तसंस्था**

कर्णधार व गोलरक्षक सविता पुनियाच्या निर्णायक कामगिरीमुळे भारताने 'एफआयएच' महिला विश्वचषक हॉकी स्पर्धेत कॅनडाला शूटआ-ऊटमध्ये ३-२ असे पराभूत करीत पहिल्या विजयाची नोंद केली. निर्धारित वेळेत १-१ असा बरोबरीत सुटल्यामुळे हा सामना शूटआऊटपर्यंत लांबला.

नवव्या ते १६व्या स्थानांसाठीच्या या सामन्यात कॅनडाकडून मेडलाइन सेकोने (११व्या मिनिटाला) गोल करीत संघाला आघाडी मिळवून दिली, तर भारताकडून सलिमा टेटेने (५८व्या मि.) गोल झळकावित सामना बरोबरीत सोडवला, मात्र गोलरक्षक सविताने भारतासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडली. शूटआऊटमध्ये सविताने प्रतिस्पर्धी संघाचे सहा प्रयत्न हाणून पाडले. भारताकडून नवनीत कौर, सोनिका आणि नेहा यांनी गोल केले.

स्पेनकडून बाद फेरीच्या सामन्यात पराभूत झाल्यानंतर भारताने कॅनडाविरुद्ध आक्रमक सुरुवात केली, पण गोलचे खाते कॅनडाने उघडले. पहिल्याच सत्रात मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरच्या संधीचे सेकोने गोलमध्ये रूपांतर करीत कॅनडाला आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्रातही भारताने अनेकदा कॅनडाच्या बचावफळीला भेदण्यात यश मिळवले, मात्र त्यांना गोल करता आला नाही. त्यामुळे सामन्याच्या मध्यंतरापर्यंत कॅनडाकडे आघाडी होती.

तिसऱ्या सत्राच्या सुरुवातीलाच नवजोत कौरने मारलेला फटका गोलजाळ्यावरून गेला. अखेरच्या सत्रात गुरजितचा पेनल्टी कॉर्नरद्वारे गोल करण्याचा प्रयत्न कॅनडाच्या गोलरक्षकाने अडवला, परंतु दुसऱ्या प्रयत्नात सलिमाने गोल करीत भारताला बरोबरी साधून दिली.

# राष्ट्रकुल स्पर्धेसाठी अनाहत सिंगची स्क्वॉश संघात निवड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी घोषित झालेल्या भारतीय स्क्वॉश संघात १४ वर्षीय अनाहत सिंगला स्थान देण्यात आले आहे. दिल्लीच्या या युवा खेळाडूने १५ वर्षांखालील गटात चमकदार कामगिरी करीत सर्वांचे लक्ष वेधले होते.

अनातने नुकतेच जर्मनी येथील स्पर्धेत जेतेपद पटकाविले, तर जूनमध्ये आशियाई किताब मिळवला. या कामगिरीच्या जोरावरच तिला भारताच्या संघात स्थान मिळाले. पुरुष दुहेरीत वेलावन सेंथिलकुमार आणि अभय सिंग यांना राष्ट्रकुलमध्ये पदार्पणाची संधी मिळेल.

**भारतीय संघ पुरुष एकेरी** : सौरव घोषाल, रमित टंडन, अभय सिंग; महिला एकेरी : जोश्ना चिनप्पा, सुनना कुरुविल्ला, अनाहत सिंग; महिला दुहेरी : दिपिका पल्लिकल, जोश्ना चिनप्पा; मिश्र दुहेरी : सौरव घोषाल-दिपिका पल्लिकल, रमित टंडन-जोश्ना चिनप्पा; पुरुष दुहेरी : रमित टंडन-हिरदरपाल सिंग संधू, वेलावन सेंथिलकुमार-अभय सिंग.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com